आनंद


बा.वा.
9339

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : 9339

BVBK-0401331




वाच. आ. वा.
9339
29/9/82

तीन अंकी बालनाट्य

# फोनने वाजवला बँडबाजा

## आनंद केदार

म … … … वाचनालय शाखा.
क्र. 9339 दि. 29/9/82
विषय बा. वा.

BVBK-0401331

मॅजेस्टिक प्रकाशन

मूल्य : १ हा रुपये

पहिली आवृत्ती
नोव्हेंबर, १९८१

© आनंद केदार
द्वारा रा. श्री. चिरमुले,
एल्-४०, रिझर्व्ह बँक कॉलनी,
मराठा मंदिर मार्ग,
मुंबई ४०० ००८

मुखपृष्ठ
जयंत ताडफळे

प्रकाशक :
अ. के. कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६ प्रसाद चेम्बर्स,
मुंबई ४०० ००४

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

---

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

नाट्यक्षेत्रातील माझ्या गुरु

सौ. सुधा करमरकर

आणि

लिट्ल थिएटर ( बालरंगभूमी )

क्र. 9339 दि. 29/9/92
विषय बा. वा.

# अंक पहिला

[ रंगमंचावर प्रेक्षकांच्या डाव्या बाजूच्या भागात राजूचे घर. हाऊसिंग सोसायटीतील फ्लॅटच्या दिवाणखाना. वातावरण मध्यमवर्गीय. दिवाणखान्यास दोन दरवाजे– एक, घरात येण्याचा आणि दुसरा घराच्या इतर खोल्यांकडे जाण्याचा. घरात टेबलावर, दिवाणावर काही हस्तकलेच्या वस्तू पडलेल्या आहेत. टेबलावर फोन आहे. रंगमंचाच्या दुसऱ्या अर्ध्या भागात एका जुनाट वाड्यातील खोली दिसत आहे. या खोलीसही दोन दरवाजे– एक बाहेरून येण्याचा आणि दुसरा आत जाण्याचा. रंगमंचाचे हे दोन्ही भाग जोडणारी भिंत, जी रंगमंचाच्या मध्यावर येते तिला एक खिडकी आहे. ही खिडकी जाळीच्या पडद्याने झाकली आहे. पडदा उघडतो तेव्हा राजूच्या घरात प्रकाश. राजू नंदूचा अभ्यास घेत आहे. ]

राजू : काय नंदू, झालं का गणित ?

नंदू : ऊं हूं.

राजू : का ? सोपं आहे ते. वाच पाहू मोठ्यानं.

नंदू : एक हौद भरायला एका नळाला अर्धा तास लागतो. त्या हौदाला असलेला दुसरा नळ तोच हौद एका तासात रिकामा करतो. दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले, तर तो हौद किती वेळात भरेल ?

राजू : हं. मग ? त्यात न येण्यासारखं काय आहे ? या प्रकारची गणितं तू केलीयस ना शाळेत ?

नंदू : पण माझी अडचण वेगळीच आहे.

राजू : कळू दे तरी तुझी अडचण !

नंदू : समज, दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले आणि हौदात पाणी भरणाऱ्या नळाचं पाणी अचानक गेलं तर ?

राजू : वा ! काय सुपीक डोकं आहे तुझं ?

नंदू : का ? नळाचं पाणी अचानक जाणार नाही, असं कशावरून ?

राजू : पण ते जाईलच, असं तरी कशावरून ?

नंदू : कशावरून म्हणजे, आमच्या घराजवळच्या नळाचं पाणी जातं, तसं !

राजू : पण गणितातल्या नळाचं पाणी असं अचानक जात नाही, नंदू.

नंदू : का ? तुमच्या ब्लॉकमधल्या नळांसारखे असतात वाटतं ते ? आमच्या झोपडपट्टीतल्या नळांसारखे नसतात ?

राजू : असं समजायचं असतं रे ! बरं. ते जाऊ दे. आता मी तुला सामान्य ज्ञानाचे प्रश्न विचारतो. आहे ना तयारी ?

नंदू : हो.

[ राजूचे बाबा— इन्स्पेक्टर देशमुख आतल्या खोलीतून बाहेर येतात. टेबलावरून पेन घेऊन ते खिशात घालतात. डोक्यावर कॅप चढवतात. त्यांची ड्यूटीवर जाण्याची तयारी चालू आहे. त्यांच्यापाठोपाठ अनू— राजूची धाकटी बहीण येते. तिची प्रदर्श-नाची तयारी चालू आहे. हस्तकलेच्या वस्तू ती नीट करते, व्यवस्थित ठेवते. राजू व नंदूची त्यांच्याकडे पाठ आहे. ]

राजू : हं. पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांना काय म्हणतात ?

नंदू : जलचर.

राजू : बरोबर. पाण्यात आणि जमिनीवर— दोन्हीकडे राहणाऱ्यांना ?

नंदू : दोन्हीकडे....अं....उभयचर.

राजू : आणि आकाशात उडणाऱ्यांना ?

नंदू : अं....मला नाही येत.

राजू : एवढं सोपं उत्तर येत नाही ? अरे, त्यांना ' खेचर ' म्हणतात !

नंदू : काहीतरीच काय ? खेचर म्हणजे गाढव. गाढवं काय आकाशात उडतात ?

राजू : अरे गाढवा, खेचर म्हणजे गाढव नव्हे. खेचर म्हणजे आकाशात उडणारे. खे म्हणजे आकाशात आणि चर म्हणजे विहार करणारे.

नंदू : पण चरणे म्हणजे खाणे ना ? आपल्याला आई नाही म्हणत ' गधड्या, किती चरशील ? ' म्हणून.

राजू : नंदोबा. आज अभ्यासात मुळीच लक्ष नाहीये तुमचं !

अनू : कसं असेल ? उद्याच्या प्रदर्शनाच्या सगळ्या वस्तू इथे समोर असताना तुझा तरी अभ्यास होईल का ?

राजू : चला, पुरे झाली शिकवणी. उठा. मी माझ्या मित्रांशी पैज मारलीय, की या वर्षी नंदू पहिल्या पाच नंबरांत आणीन, म्हणून.

अनू : पण परवा मिनी म्हणाली की, नंदू सारखा नापास होतो.

बाबा : हो. म्हणूनच त्याला शिकवून हुशार करणार आहे राजू. आधीच हुशार असलेल्या मुलाला शिकवून काय फायदा ? त्याचं परसेंटेज तेवढं वाढणार. त्यापेक्षा नापास होणाऱ्या मुलाला शिकवून तयार केलं तर त्याला अर्थ आहे.

राजू : हं, म्हणूनच मी दर वर्षी एकेका मुलाला शिकवायचं ठरवलंय्.

अनू : बाकी राजू म्हणजे ग्रेटच की नाही हो बाबा ? आपल्या हुशारीचा इतरांना फायदा देतो.

बाबा : नुसतं राजूचं कौतुक करत बसू नका. त्याच्यासारखं थोडं तरी वागायला शिका.

नंदू : राजू, मी जातो रे त्या गाडेकरांकडे– आईला मदत करायला. काम आटपलं की परत येईन. ( जातो. )

बाबा : ( घड्याळाकडे पाहत ) काय ग, आटपलं का तुझं ? किती वेळ लावणार आहेस अजून ?

आई : ( आतूनच ) अहो, थांबा हो जरा. आता बराच वेळ घरात नाही आपण. नीट आवराआवर नको करायला ?

बाबा : ती आवराआवर आता आवर. उशीर होतोय् मला जायला. तुला इथे जवळच जायचंय्. मला जायला लागेल तास, दीड तास.

राजू : बाबा, आज तुमची ड्यूटी किती वाजता आहे हो ?

बाबा : रात्री नऊ ते सकाळी सहा. जसं काही माहीतच नाही तुला. अग, चल ना लौकर. ( अनूला ) तुझ्या आईचं हे नेहमीचं आहे. कध्धी वेळेवर निघायची नाही. स्वतः उशिरा निघेल आणि इतरांनाही उशीर करील.

अनू : अग आई, आटपलं की नाही ?

आई : ( बाहेर येत ) ॲटपलं बरं ॲटपलं ! आणि काय हो, मुलांना काय सांगताय् ? ( मुलं हसतात. ) हसताय् काय ? सांगते ते नीट ऐका. जेवण झालंय् तुमचं. पण तरीही भूक लागली तर टेबलावर दूध आणि बिस्किटं ठेवलीयत, ती खा.

राजू : दूध ? नको रे बाबा.

अनू : आई, दूध नुसतंच ठेवलंयस् ? तापवायचं असेल ना ? मी तापवू ?

आई : काही नकोय् दूध तापवायला. गॅसवर दूध ठेवायचं आणि आपण जायचं गाव धुंडाळायला. मग सगळं पातेलं करपून काळं होतंय्. हात लावायचा नाही गॅसला.

राजू : अग आई, तूच म्हणतेस ना–दिवसातून दोन वेळा दूध तापवावं, म्हणजे नासत नाही.

आई : बरं बरं. कळली तुझी अक्कल !

बाबा : आता तू निघतेस का जाऊ मी ?

आई : अहो थांबा हो. ( मुलांना ) हे बघा, ओल्या हातानं दिव्याचं बटन बंद करू नका, नाहीतर बसेल शॉक.

अनू : पुरे ग तुझी रेकॉर्ड !

आई : माझी रेकॉर्ड काय ?

राजू : नाहीतर काय ? नेहमी नेहमी त्याच त्याच गोष्टी सांगायच्या. आम्ही काय लहान आहोत आता ?

बाबा : ( उपरोधाने ) छे छे, फार मोठे झालात. शिंगं फुटली तुम्हाला. तरीही ह्या गोष्टी तुम्हाला सांगाव्याच लागतात. कारण तुम्ही ऐकता कुठे ?

आई : रात्री त्या गिरिजाबाईंना फोन करा.

बाबा : तुमच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला नक्की येतायत् ना, ते विचारून घ्या. अच्छा, ऑल् द बेस्ट.

आई : प्रदर्शनाच्या तयारीसाठी जास्त वेळ जागत बसू नका. आणि फर्निचर खराब केलेलं मला मुळीच खपायचं नाही, सांगून ठेवत्ये. ( बाबांना ) चला हो, निघू या ना ?

बाबा : मुलांना सगळे डोस पाजून झाले असतील तर निघू या. [ दोघे जाऊ लागतात. आई पुन्हा परत येते. ]

आई : आणि हो, झोपताना दिवे मालवून झोपा. आणि आता घराबाहेर जाऊ नका. नाहीतर चावी राहील आत आणि तुम्ही बाहेर. तुमची नेहमीचीच सवय आहे ती. हं.... तशी ढमढेरे काकूंकडे एक चावी दिलीय् मी. हवं असेल तर बोलवा त्यांना सोबतीला.

अनू : ढमढेरेकाकू ? आटपलं.

आई : का ? काय झालं ?

अनू : सारख्या फोनवर काहीतरी बोलत बसतील.

राजू : म्हणून काय झालं ? किती जॉली आहेत त्या– धम्माल करतात.

आई : म्हणूनच सांगितलंय् त्यांना. बरं, आम्ही येतो. ( आई–बाबा जातात. राजू, अनू दाराशी जाऊन परत येतात. )

अनू : चला. राजू, अजून बरीच कामं व्हायचीयत्. सगळ्या वस्तू नीट मांडायच्या आहेत.

राजू : पण आपली कंपनी कशी आली नाही अजून ? ( दारात ढमढेरेकाकू येतात. अनूचे अचानक त्यांच्याकडे लक्ष जाते. )

अनू : ढमढेरेकाकू, तुम्ही ?

काकू : हो, मीच. तुमच्या आई–बाबांनी तुमच्यावर लक्ष ठेवायला सांगितलंय् ना ? पण काय ग, अजून तुमची वानरसेना कशी नाही आली ?

अनू : वानरसेना नाही काही. ती तर आमची मित्रमंडळी.

काकू : माकडंच ती.

[ गोंगाट करीत पम्या, अभि, मिनी, नीतू येतात. त्यांच्या गडबडीत ढमढेरेकाकूंना धक्का लागून त्या पडतात. ]

काकू : काय मुलं तरी ही ? हूं. आणि काय रे, ह्यांचे आई–बाबा गेल्यावर अगदी लगेच आलात ते !

अभि : ती दोघं बाहेर कधी पडतायत्, याचीच वाट पाहात आम्ही उभे होतो. ते गेले, आम्ही आलो.

पम्या : ( दिवाणावर उभा राहून ) ए, मी बघा काय आणलंय्, कंदील !

काकू : ( त्याला धपाटा देत ) उतर खाली. लोकांचं फर्निचर खराब होतं.

अनू : पम्या, तो कंदील तू केलास ?

पम्या : नाही तर काय, तू केलास ?

अनू : तू नेहमी नुसती तोडफोड करीत असतोस. तुला जोडायचंही काम येतं, हे मला माहीत नव्हतं म्हणून विचारलं.

पम्या : ( उसळून ) चूप.

नीतू : पण हा केलाय् कशाचा ?

पम्या : कागदाच्या कपटयांचा !

राजू : वा ! काय मस्त उपयोग केलाय् ! ( तेवढ्यात फोन वाजू लागतो. ) काय कटकट आहे. कामाला सुरुवात करणार तर हा फोन....

काकू : तुम्ही करा तुमचं काम. मी घेते तो फोन. ( फोन घेत ) हॅलो, कोण बोलतंय् ?

[ खिडकीच्या भागात प्रकाश. तिथे एक माणूस फोनवर दिसतो. ]

माणूस : तुम्ही कोण बोलताय् ?

काकू : मी, मी ! मी बोलतेय् मी ! पण मी कोणी का असेना, तुम्हाला कोण हवंय् ?

माणूस : मला अनंत नागपूरकरांशी बोलायचंय् !

काकू : अनंत नागपूरकर ? इथे नागपूरकर नाही राहात.

पम्या : ( काकूंकडून फोन घेत ) तुम्हाला नागपूरकर हवेत ना ? मग नागपूरला फोन करा की, आम्हाला कशाला त्रास देता ?

काकू : ( फोन खेचून घेत ) म्हणे नागपूरला फोन करा.

माणूस : पण नागपूरकरांनी मला हाच नंबर दिला होता.

काकू : त्याला मी काय करू ? माझं नाव अनंत नागपूरकर आहे, असं खोटंच सांगू ?

माणूस : तसं नव्हे हो.

काकू : मग कसं हो ?

पम्या : ( फोन ठेवून देत ) आता असं हो. ( खिडकीत काळोख. )

काकू : अग्गोबाई, माझी फोडणी जळली तिकडे. जाते मी. पण फोन आला की मला हाक मारायची. कळलं ? ( काकू जातात. )

अनू : चला. उद्या सकाळी नऊ वाजता प्रदर्शनाचं उद्घाटन व्हायचंय्. तयारी करायला हवी.

मिनी : बाईसाहेब, आपलं भाषण आवरा आणि कामाला सुरुवात करा.

नीतू : आधी प्रत्येकानं काय काय आणलंय्, ते दाखवा. म्हणजे प्रदर्शनात कसं मांडायचं, ते ठरवता येईल.

[ सगळे एकदम गलका करतात. ]

राजू : चूप बसा रे. एकेकानं दाखवा आपलं कलाकौशल्य. मांडण्यातलं कौशल्य नकोय् मला. पम्या, तू कंदील आणलास. मिने, तू ?

मिनी : मी कागदाच्या पट्ट्यांचा शो पीस केलाय्.

पम्या : कागदाच्या पट्ट्या मुद्दाम कापून केलेली वस्तू ही कचऱ्यातून कला होईलच कशी ?

मिनी : तुला कोणी सांगितलं, कागद मुद्दाम कापले म्हणून ? ताईच्या ड्रॉईंग पेपरच्या पट्ट्या उरल्या होत्या. त्या जमवून केलाय् मी हा शो पीस.

अभि : मी बघ ' कोलाज ' केलंय्. ( चिकटचित्र दाखवतो. )

नीतू : राजू, आमच्या वस्तू पाहिल्यास तू. पण, तू काय केलंयस्, ते दाखव पाहू आधी.

मिनी : राजू ना, लबाड आहे एक नंबरचा. बघ कसा चूप बसलाय् तो !

राजू : तो आपला एक सस्पेन्स आहे. आपण आपली कला डायरेक्ट उद्या दाखवणार.

अभि : हे मुळीच चालणार नाही.

पम्या : राजू, दाखवतोस की नाही त्या खोक्यात काय आहे ते ? नाहीतर आम्ही आमच्या वस्तू प्रदर्शनात ठेवणार नाही.

अनू : असं काही करू नका रे. आपण त्या आनंदाश्रमाच्या बाईंना सांगितलंय् की, या प्रदर्शनातून मिळणारे पैसे आश्रमाला देऊ. प्रदर्शन झालंच नाही, तर पैसे कुठून देणार ? फुकट टिंगल होईल आपली !

नीतू : आणि त्या गिरिजाबाईंना बोलावलंय् त्याचं काय ? त्यांनी आपली सगळी इष्टेट....

पम्या : इष्टेट नव्हे ग. इस्टेट. इ....स्टे....ट.

अभि : तू गप रे. महत्त्वाचा मुद्दा बोलत असताना मिष्टेक काढू नकोस.

पम्या : पुन्हा तुझी मिष्टेक. म्हण मिस्टेक....

नीतू : हं तर, त्या गिरिजाबाईंनी आपली सगळी इ...स्टे...ट अपंग मुलांसाठी जाहीर केलीय्. म्हणून आपण त्यांना उद्घाटनाला बोलावलंय्. प्रदर्शनच झालं नाही तर उद्घाटन कसलं करणार, कप्पाळाचं ?

[ नीतूच्या केसांवरचा बॅंड तिच्या कपाळावर सरकवून तो कापल्याचा अभिनय मिनी करते. ]

अनू : मिने, काय करतेयस् ?

मिनी : उद्घाटन, नीतूच्या कप्पाळाचं. ( मुलं हसतात. त्यामुळे नीतू चिडते. )

राजू : बरं बुवा, बघा आम्ही काय केलंय् ते !

( मुलं तोंडाने पार्श्वसंगीत देतात. ढण् ट ढण...)

मिनी : अय्या, नाटकाचं स्टेज ?

नीतू : किती सुंदर !

पम्या : ब्यूटीफुल !

अभि : फँटास्टिक!

पम्या : पण राजू, हे केलंय् कशाचं?

राजू : आपल्या वह्यांचे पुठ्ठे, रंगीत कागद आणि असंच सटरफटर! (तोच फोन वाजू लागतो. राजू नाराजीने फोन घेतो.) हॅलो.... हॅलो....कोण बोलतंय्?

[ खिडकीचा भाग प्रकाशात येतो. तिथे एक माणूस दिसतो– हा आवाज १. दुसरा आवाज माईकवरून ऐकू येतो. ]

दोन्ही आवाज : हॅलो, हॅलो कोण बोलतंय्?

आवाज १ : हॅलो, कोण बोलतंय्?

आवाज २ : तुम्ही कोण?

राजू : पण तुम्ही कोण?

आवाज १ : हे पहा, जास्त बोलू नका. गुपचुप फोन ठेवून द्या.

राजू : मग, तुम्ही फोन केलातच कशाला? उगीच आम्हाला त्रास!

आवाज १ : ए पोरा, जास्त शहाणपणा करू नकोस. एक कानफटात देईन.

राजू : द्या द्या. माझा कान जवळच आहे फोनच्या. आणि मलाही कळेल फोनवर कसं कानफटात मारतात ते!

[ फोन ठेवतो. खिडकीत काळोख होतो. ]

अनू : काय रे, फोनवर कुणाच्या कानफटात मारत होतास?

राजू : मी नव्हतो मारत. तो माणूस म्हणाला– कानफटात मारीन. म्हटलं– मारा तरी, मलाही कळेल फोनवर कानफटात कसं मारतात ते.

पम्या : पण त्यानं फोन केलाच कशाला?

राजू : त्यानं फोन केला नसेल आपल्याला. चुकून नंबर लागला असेल

आपला, क्रॉस लाईन. कारण मला दोघाजणांचं बोलणं ऐकू आलं.

नीतू : चला. अजून बरंच काम व्हायचंय् आपलं. आपल्या सगळ्या वस्तूंवर किंमतींची आणि नावांची लेबलं लावायचीयत्. ( सगळेजण काम करू लागतात. )

अनू : ए, पण आज पप्पू हवा होता नाही ? काय मजा आली असती.

पम्या : हो ना ! मदतसुद्धा किती केली असती त्यानं. पण काय करणार ? त्याचा तर पत्ताच लागत नाहीये, दोन दिवस झाले तरी !

राजू : त्याची आई किती रडत होती, म्हणाली– कार्निव्हलच्या गर्दीत हात धर म्हणून सांगितलं, तरी हट्टानं एकटाच चालत राहिला. आणि मग गर्दीत पप्पू हरवला.

नीतू : पण राजूच्या बाबांना कळवलंय् ना त्यांनी ?

मिनी : राजूचे बाबा इन्स्पेक्टर आहेत. या प्रकरणाचा तपास लावल्या-शिवाय ते मुळीच राहणार नाहीत.

अनू : माझी आई म्हणाली की, येत्या दोनतीन दिवसांत त्याचा तपास लागला नाही, तर त्याचे आई–बाबा म्हणे पेपरात जाहिरात देणार आहेत— ' हरवला आहे ' म्हणून !

मिनी : आणि माझे बाबा म्हणाले की टी. व्ही. वर ' लापता लापता ' मध्ये त्याचा फोटो देऊन माहिती सांगणार आहेत.

नीतू : ए, पण पप्पू पळून तर गेला नसेल ?

अभि : अग मूर्खे, तो पळून जाईलच कशाला ? पपू तर चांगला हुशार आहे.

पम्या : शिवाय त्याचे आई–बाबा त्याला कधीच रागावत नाहीत.

राजू : आणि समजा ते रागावले, तरी कुणी घरातून पळून जातं का ?

अनू : मग काय ? आपल्या चांगल्यासाठीच आपले आई–बाबा रागाव-तात, हे काय त्याला माहीत नाही ?

मिनी : नाही तर काय ? ही नीतू काहीतरीच शंका काढत असते. बावळट !

नीतू : तू मूर्ख !

मिनी : तू महामूर्ख !

नीतू : तू शतमूर्ख !

मिनी : तू वेडी !

नीतू : तू खुळी !

[ दोघींचे भांडण चालू असताना पम्या मिनीने आणलेल्या कागदाच्या शो पीसला हात लावतो. ]

मिनी : पम्या, पम्या मोडशील ते.

पम्या : त्यात काय आहे मोठंसं !

राजू : भांडू नका. आपण सगळ्या वस्तू बेडरूममध्ये नेऊन ठेवू या. उगाच बाहेरच्या खोलीत पसारा नको.

[ मुलं आत जातात. फोन वाजू लागतो. खिडकीच्या भागात आवाज १ दिसतो. खिडकीवर प्रकाश. आवाज २ माईकवरून ऐकू येतो. राजू येऊन फोन घेतो. ]

आवाज १ : हॅलो....

आवाज २ : हॅलो.... ( पम्या येतो. )

राजू : अरेच्या ! मघाशी जी दोन माणसं बोलत होती, तीच बोलतायत्. एवढा वेळ काय बोलतायत् ?

पम्या : त्यांचं बोलणं तरी ऐक.

राजू : पण माझे बाबा म्हणाले की दुसऱ्याचं बोलणं चोरून ऐकू नये.

पम्या : पण आपण कुठे फोन केलाय् ? त्यांनीच तर आपल्याकडे फोन

केलाय् !

( राजू ते संभाषण ऐकू लागतो. )

आवाज १ : हं. तर तू ट्रक घेऊन ये. आम्ही सामान तयार ठेवतो. माल वेळेवर पोहोचला नाही तर हजारो रुपयांचं नुकसान होईल.

आवाज २ : मी आठ वाजता ट्रक घेऊन येतो. तुम्ही तयार राहा.

आवाज १ : गेली दहा–बारा मिनिटं मी जे काही सांगतोय्, ते नीट ऐकलंयस् ना ? हे बघ, पाठलाग होणार नाही, याची खबरदारी घे.

आवाज २ : बरं, मी फोन ठेवतो. मी निघालो की ८१४२५९ ला फोन करतो.

आवाज १ : पुन्हा सांग.

आवाज २ : ८१४२५९ ला फोन करतो.

( फोन ठेवला जाणार, हे लक्षात येऊन राजू बोलतो. )

राजू : हॅलो, हॅलो....

आवाज १ : कोण तुम्ही ?

राजू : तुम्ही कोण ?

आवाज १ : ए पोरा, मघाशी मध्ये बडबडलास तेवढं पुरे.

राजू : मग तुम्ही फोन करताच कशाला ? विनाकारण त्रास.

आवाज १ : मी तुला फोन केला नाहीये.

राजू : मग रिंग वाजलीच कशी ?

आवाज १ : ते मला माहीत नाही. तू कोण आहेस, ते मला चांगलं माहीत आहे....

राजू : कसं हो ? तुम्ही मला ओळखता ?

आवाज १ : ( दात ओठ खात ) तू कोण आहेस, ते मला चांगलं माहीत आहे आणि तू काय करतोयस् ते मी पाहिलंय् .

राजू : म्हणजे फोनवरून कानफटात मारता येते, हे मघाशी कळलं.

पण फोनवरून दिसतं, हे आपल्याला नव्हतं माहीत.

आवाज १ : आता कळलं ना? ठेव तो फोन.

( राजू फोन ठेवल्यासारखं करतो व पुन्हा ऐकू लागतो. )

आवाज १ : एक्स्!

आवाज २ : हं.

आवाज १ : नक्की ठरलं. तू ठीक आठ वाजता ट्रक घेऊन ये.

आवाज २ : ओ. के.

[ खिडकीत आवाज १ फोन ठेवतो. तिथे काळोख होतो. राजूही फोन ठेवतो. ]

राजू : त्या दोघांचा काहीतरी प्लॅन आहे.

नीतू : कशावरून?

राजू : त्यातला एक म्हणाला माल तयार आहे. तो वेळेवर पोहोचला नाही तर हजारो रुपयांचं नुकसान होईल. त्यावर दुसरा म्हणाला– मी ठीक आठ वाजता ट्रक घेऊन येतो.

पम्या : म्हणजे नक्कीच काहीतरी गडबड आहे.

अभि : काहीतरी पळवून न्यायचा बेत दिसतोय त्यांचा.

नीतू : पण काय पळवणार ते?

मिनी : काहीही. हल्ली काही माणसं आपल्याकडल्या जुन्यापुराण्या मूर्ती चोरून नेतात आणि परदेशात विकतात.

अनू : त्यामुळे आपल्याइथली कला नाहीशी होणार.

पम्या : मला वाटतं, आपण त्यांचा पाठलाग करू या.

राजू : त्या दोन माणसांचा?

पम्या : हो. ( मिनी हसते. ) खिदळतेस काय मिने?

मिनी : हसू नको तर काय करू? इथे घरात बसून पाठलाग करायचा

म्हणे. ती काय शिवाशिवी खेळायचीय्?

नीतू : बघ तरी.

अनू : बॅघ तॅरी काय बॅघ तरी? प्रयत्न करायचा सोडून चेष्टा करतायत्.

पम्या : आपण त्यांना फोनच करू या.

अभि : पण फोनवर काय बोलणार?

राजू : आयडिया! मघाशी फोनवर तो माणूस मला दम देताना म्हणाला– तू कोण आहेस ते मला चांगलं माहीत आहे आणि तू काय केलंस, ते मी पाहिलंय्!

नीतू : मग?

राजू : मग काय? आपण त्याला फोन करायचा आणि फोन लागला की त्याच्याच शब्दात त्याला दरडवायचं– 'तुम्ही कोण आहात, ते आम्हाला माहीत आहे आणि तुम्ही काय केलंत, ते आम्ही पाहिलंय्.'

[हे ऐकताच पम्या फोनकडे धावतो व नंबर फिरवू लागतो. खिडकीचा भाग उजळतो. तिथे मोठ्या मिशा असलेला एक तरुण दिसतो. तो फोनवर बोलू लागतो.]

पम्या : हॅलो—

तरुण : हॅलो, मी देशपांडे बोलतोय्!

पम्या : हॅलो मी मिस्टर एक्स् बोलतोय्.

देशपांडे : कोण? मिस्टर एक्स?

पम्या : मी मिस्टर एक्स् बोलतोय्. तुम्ही कोण आहात, ते आम्हाला माहीत आहे आणि तुम्ही काय केलं, ते आम्ही पाहिलंय्.

देशपांडे : काय म्हणालात? पुन्हा बोला.

[ पम्या तेच वाक्य पुन्हा बोलतो. तो माणूस पम्याचा आवाज ओळखतो. ]

पम्या : आता का चूप झालात ?

देशपांडे : मी कशाला चूप होऊ ?

पम्या : उगीच खोटं बोलू नका.

देशपांडे : ए, जादा आवाजी करू नकोस.

पम्या : तुम्ही कोण हो, मला दम देणारे ?

देशपांडे : मी कोण ? नाव कळलं तर घाम फुटेल.

पम्या : जा जा. घाम फुटेल म्हणे !

देशपांडे : पोलीसला फोन करू का ?

पम्या : प...प...पोलीसला ? क–कशाला ?

देशपांडे : तुला पकडायला !

पम्या : पण मी कोण आहे ते तुम्हाला कुठे माहीताय् ?

देशपांडे : सांगू का तुझं नाव ?

पम्या : सांगा, सांगा.

देशपांडे : प्र....मो....द !

पम्या : बाप रे !

देशपांडे : पम्या, लेका, मी सुहासदादा बोलतोय्. मला दम देतोस काय ? आईला नाव सांगू ?

पम्या : नको नको. मी आपली भंकस केली.

देशपांडे : भंकस ?

[ पम्या गडबडीने फोन ठेवतो. खिडकीत काळोख. ]

अभि : काय पम्या, कोण बोलत होतं ?

पम्या : कोणी नाही, कोणी नाही.

राजू : खोटं बोलू नकोस. तू काय बोललास ते आम्ही ऐकलं.
अनू : कशी घाबरगुंडी उडाली होती.
पम्या : घाबरगुंडी ? अरे हट्.
मिनी : हट् काय पम्या ? तूच हट्.
पम्या : मग ? मला काय माहीत– फोनवर कोण बोलतंय् ते !
नीतू : चांगली अद्दल घडली.
अभि : गेला एकदम फोन करायला.
मिनी : पण पम्या, कोण होता तो ?
पम्या : सुहासदादा.
अनू : म्हणजे तो मिशीवाला ?
नीतू : ज्याला तू घाबरतोस तो ?
राजू : मग बरोबर आहे, पम्याची स्वारी भ्यायली ते !
मिनी : पम्या, बावळटा आवाज तरी बदलायचास...
अभि : पण राजू, त्या दोन माणसांच्या बोलण्यात फोनचा उल्लेख झाला होता का रे ?
राजू : फोन...झाला होता खरा ! ८१४२५९ की ८१४५२९ ? हां ८१४५२९ ! (राजू फोन नंबर फिरवू लागतो. ढमढेरेकाकू येतात.)
काकू : मला नाही बोलवायचं फोन आला तर ?

[ खिडकीचा भाग उजळतो. तिथे फोनची रिंग वाजते. एक गायक गाताना दिसतो. ]

गायक : काय कटकट आहे ? जरा कुठे गायला सुरुवात केली, तर फोन ! उद्या कार्यक्रम आणि अजून गाणी तयार नाहीत. कैसे होगा ऑर्केस्ट्रा ? (फोन उचलून) हॅलो....
काकू : कोण बोलतंय् ?

गायक : ( गाऊ लागतो. ) तुम कौन हो ? बताओ तुम्हारा नाम् है क्या ? काम है क्या ?

पम्या : लागला का फोन ?

काकू : लागला. एका गायकाकडचा आहे. गातच सुटलाय् फोनवर.

मुलं : बघू बघू.

राजू : बघू काय ? ऐकू म्हणा.

काकू : अरे, गाता काय है ? तुम्हारा नाम सांगो नाम।

गायक : पहले तुम।

काकू : पहले तुम।

गायक : तुम।

काकू : तुम।

गायक : चूप.

काकू : सांगती हूँ। ऐको. मेरा नाम चुनचुनचुन....

मुलं : टुनटुनटुन.

काकू : ला ला ला ला ला ला ला ला. हॅलो मिस्टर हाऊ डू यू डू ?

पम्या : बाबा.

मुलं : ( ओरडत ) आई.

गायक : आपकी आवाज जानी पहचानीसी है. ( गाऊ लागतो. )
अजनबी, तुम जाने पहचानेसे लगते हो।
ये बड़ी अजीबसी बात है, कि नयी नयी मुलाकात है....अजनबी.

काकू : अहो तुम्ही गाताय् काय ? नाव सांगा तुमचं.

गायक : नाव सांगून काय फायदा ?
नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा मेरी आ ऽ ऽ वाज ही....
( गाताना बेसूर होतो. राजू काकूंकडून फोन घेतो. )

राजू : पुरे पुरे पुरे. नाव सांगा तुमचं.

गायक : फोन तुम्ही केलात ना? मग तुमचं नाव सांगा आधी.
राजू : ( गाऊ लागतो. ) मेरा नाम राजू, घर अनाम
बहती है गंगा, जहाँ मेरा धाम।

[ राजू फोन ठेवतो. गायक चिडतो. ]

गायक : ( आश्चर्याने ) बाप रे! आधी फोनवर बाई बोलत होती. एकदम बुवाचा आवाज कसा आला?

[ खिडकीत काळोख ]

काकू : ( राजूला ) अरे, फोन कशाला ठेवलास? दोन भजनं म्हटली असती. अग्गोबाई, बालदी वाहून गेली असेल. जाते मी. फोन आला की मला हाक मारा. ( जातात. )
राजू : काय वेडा होता नाही? सारखा गातच होता.
अनू : पण काकूंनी फोन का नाही केला?
राजू : त्यांना वाटलं असेल, आपली करमणूक होईल.
पम्या : राजू, चल आटप लौकर.
राजू : पम्या, तू घरी सांगून आलायस् ना, उशीर होईल म्हणून?
पम्या : पण आई-बाबा मावशीकडे गेलेत.
मिनी : मग रामा गड्याकडे निरोप तरी ठेवायचास.
नीतू : जा, आधी सांगून ये.
पम्या : मी नाही जात. मी इथूनच फोन करतो.
अभि : पण फोन घेणार कोण?
पम्या : कोण म्हणजे? रामा!

[ पम्या फोन नंबर फिरवू लागतो. खिडकीचा भाग उजळतो. तिथे रामा गडी येऊन फोन घेतो. ]

रामा : हाल्ड, कोन बोलतंया ?
पम्या : मी मिस्टर एक्स् बोलतोय्.
रामा : कोन ? यक्ष ? म्हंजी यक्षदेव ?
पम्या : हो यक्षदेव !
रामा : कुटून बोलतायसा ?
पम्या : स्वर्गातून.
रामा : आरं देवा, म्हंजी हिकडं प्रिथ्वीवर काय चाललंय्, ते तुमास्नी दिसत आसंल न्हवं ?
पम्या : तू कोण आहेस, ते मला माहीत आहे आणि तू काय केलंस्, ते मी पाहिलंय्.
रामा : म्हंजी तुमी समदं पाहिलंय जनू ?
पम्या : हो, तू केलेल्या सर्व चांगल्या-वाईट गोष्टी मी पाहिल्या.
रामा : म्हंजी सैपाकघरात चोरून दूध प्यायलं ते पायलं व्हय ?
पम्या : हो. तू चोरून दूध पिताना पाहिलंय.
रामा : आनी फिरीजमदली सपरचंदं चोरून खाल्ली त्ये ?
पम्या : हो. चोरून सफरचंदं खातानासुद्धा पाहिलंय्.
रामा : म्हंजी तुमी खरंखुरं यक्षम्हाराज हायसा की !
पम्या : मग ? तुला खोटं वाटतंय ?
रामा : तसं न्हवं. पर...
पम्या : बोल काय ते !
रामा : तुमी सर्गातून बोलताय् न्हवं ? सर्गात काय फोन हाय व्हय ?
पम्या : चूप. मला उलट प्रश्न विचारतोस ? आईला सांगू ?
रामा : म्हंजी ? तुमी परमोदशेट बोलताय् ?
पम्या : हो. मी पम्या बोलतोय् पम्या.
रामा : आरं माज्या कर्मा !

पम्या : हे बघ, एक निरोप ठेव. आई-बाबा आले की त्यांना सांग, मी राजूकडे आहे. प्रदर्शनाची तयारी करतोय्. मला यायला उशीर होईल.
रामा : जी. पर त्ये दूध आणि सपरचंदाचं तेवढं बाईंना सांगू नका.
पम्या : बरं बरं. ठेव तो फोन.

[ पम्या फोन ठेवतो. रामाही फोन ठेवतो. खिडकीत काळोख. ]

पम्या : आमच्याच घरात राहून चोरी करून खातो काय? आता बघ म्हणावं मजा !
नीतू : चला, आपल्याला आपल्या किचन बँडची प्रॅक्टिस करायचीय् ना?
मिनी : चला चला.
अनू : थांबा.
पम्या : का?
अनू : स्वैपाकघरातल्या कुठल्याही वस्तूला तुम्ही हात लावायचा नाही. सगळ्या वस्तू मी तुम्हाला काढून देईन. नाही तर आई रागावेल मला.

[ सगळी मुलं आत जातात. राजूच्या घरात काळोख होतो. रंगमंचाच्या दुसऱ्या अर्ध्या भागात प्रकाश. तिथे १५–१६ वर्षांचा एक थकलाभागला मुलगा पाठीवर पोते घेऊन बाहेर येतो व आत जातो. दुसरा मुलगा– साधारण त्याच वयाचा, पोते घेऊन बाहेरून येतो. वजन न पेलल्याने तो पडतो. आत गेलेला मुलगा धावत येऊन त्याला सावरतो व विचारतो— ]

सोम्या : जानू, सगळी पोती आली ना?
जानू : हो, एकूण सहा पोती आहेत, सोम्या.

[ दोघे मिळून ते पोते आत नेऊन टाकतात व बाहेर येतात. ]

सोम्या : आज फक्त सहाच पोती ? रोज कमीतकमी दहा-बारा पोती असतात. आणि आज फक्त सहा ?

जानू : तो गाडीवाला म्हणाला की, मालिकने बोला है—आज सिर्फ छः गोनी हैं।

सोम्या : बरोबरच आहे म्हणा ! हल्ली मुंबईला केळीच कमी येतात, तर त्यांची सालं तरी कशी जास्त जमतील ?

जानू : म्हणजे ?

सोम्या : म्हणजे काय ? या पोत्यात काय आहे ते तुला माहीत नाही ?

जानू : नाही.

सोम्या : आख्ख्या मुंबईभर रस्त्यावर पडलेली केळीची सालं गोळा करायला आपल्या मालकानं काही मुलं ठेवलीयत्. दिवसभर हिंडून ती मुलं सालं गोळा करतात आणि एका ठराविक ठिकाणी आणून जमा करतात.

जानू : पण त्यांचा उपयोग काय ?

सोम्या : जानू, तू नवीन आहेस त्यामुळे तुला काहीच माहीत नाही. आपण ज्याला मालक म्हणतो तो माणूस दिसतो तसा साधा सरळ मुळीच नाहीये.

जानू : बापरे ! म्हणजे तो आहे तरी कोण ?

सोम्या : तो ही केळीची सालं गोळा करतो, त्यांचे बारीक तुकडे करून घेतो...

जानू : कोणाकडून ?

सोम्या : त्यासाठीही त्यानं बरीच माणसं ठेवलीयत् !

जानू : हो ?

सोम्या : या सालींचे तुकडे न धुताच...

जानू : शी ऽ घाण...

सोम्या : न धुनाच साखरेच्या रंगीत पाकात बुडवतो आणि कमी भावानं विकतो.

जानू : पण असले घाणेरडे पदार्थ विकत कोण घेतं ?

सोम्या : कोण म्हणजे रस्त्यावरचे फेरीवाले–घाणेरडी आईस्फ्रूटं, गोळ्या विकणारे, आणि त्यांच्याकडून हे पदार्थ घेणारी लहान मुलं !

जानू : आणि ?

सोम्या : आणि काय, आणि ? असले बरेच घाणेरडे, भेसळीचे धंदे आपला मालक करतो.

जानू : पण...मला तर यातलं काहीच माहीत नाही.

सोम्या : कसं असणार ? मालकानं इकडचा माल तिकडे नेण्यासाठी नोकरीवर ठेवलंय्– हमाली करण्यासाठी ! तो तुला थोडाच सांगणार आहे की मी भेसळ करतो, त्यात तू मला मदत कर, म्हणून ?

जानू : ( जरा मोठ्या आवाजात, निग्रहानं ) यापुढे असलं घाणेरडं काम मी मुळीच करणार नाही.

सोम्या : हळू बोल, मालक आहे आत.

जानू : त्यांना गाढ झोप लागलीय्.

सोम्या : अस्संच, अगदी अस्संच मी त्यावेळी म्हटलं होतं.

जानू : त्यावेळी म्हणजे कधी ?

सोम्या : चार वर्षांपूर्वी.

जानू : म्हणजे ? तू किती वर्षं मालकाकडे काम करतोयस् ?

सोम्या : जवळजवळ पाच वर्षं ! पावसाळ्याचे दिवस होते. जोरात पाऊस पडत होता. म्हणून मी इथेच बाहेर आडोशाला उभा होतो. माझ्या घरची परिस्थिती वाईट. मला शिक्षण अर्धवट सोडावं लागलं होतं. आई आजारी ! तिच्या औषधाला पैसे हवेत, म्हणून काम शोधायला मी बाहेर पडलो होतो.

[ फ्लॅशबॅक सुरू होतो. तेच स्थळ. पावसाचा, विजांचा आवाज. दरवाजाबाहेर सोम्या उभा आहे. खोलीत मालक म्हणजेच पहिल्या अंकातील आवाज १ फेऱ्या घालताना दिसतो. ]

मालक : कुठे तडमडलेत सगळे देव जाणे ! नऊपर्यंत बॅग पोचली नाही तर सगळाच घोटाळा होईल. काय करावं ? ( फेऱ्या मारता मारता सहज दाराकडे लक्ष जातं. सोम्याला पाहून मनाशी काहीतरी ठरवून ) ए पोरा, काय हवंय् तुला ?

सोम्या : काही नाही. पाऊस पडतोय् म्हणून आडोशाला उभा आहे.

मालक : एक काम करशील ? दोन रुपये देईन.

सोम्या : दोन रुपये ? करीन, करीन. माझ्या आईला औषध आणता येईल मला. सांगा साहेब, काय काम करायचंय् ?

मालक : तुला लिहिता वाचता येतं ना ?

सोम्या : हो.

मालक : मग हा घे पत्ता. ( एक कागद देतो. ) या पत्त्यावर ही बॅग पोचवायची, लौकर–नऊ वाजायच्या आत. पळ, बॅग पोचवून इकडे ये. तुला पैसे देईन मी. ( सोम्या मान हलवतो आणि बॅग व पत्ता घेऊन जातो. काळोख. )

[ फ्लॅशबॅक चालूच आहे. दुसरा दिवस–' मालक, मालक ' असं ओरडत सोम्या येतो. ]

मालक : ( आतून बाहेर येत ) काय रे ? काय झालं ?

सोम्या : मालक, तुम्ही सांगितलेलं करून येताना काही माणसं माझा पाठलाग करू लागली. ती येतायत्.

मालक : घाबरू नकोस, मी तुला लपवून ठेवतो. ते लोक गेले की बघू. आता तू आतल्या खोलीत जा.

[ बाहेर ओरडाआरड होते-' कहाँ भागा वो लडका ? ' ' किधर गया ? ' ' पकडो उसे ! '—गडबड शांत होताच मालक सोम्याला हाक मारतो. ]

मालक : सोम्या, बाहेर ये.

सोम्या : ( आतूनच ) गेले ते ?

मालक : हो. मुळीच घाबरू नको, बाहेर ये.

सोम्या : ( बाहेर येत ) खरंच गेले ते ?

मालक : हो. काम झालं ?

सोम्या : ( मान हलवून ) चारी बॅगा पोचवल्या.

मालक : शाबास. बराच हुशार झालास तू ! काल एक बॅग पोचवलीस आणि आज एकदम चार ! हे घे पैसे.

सोम्या : ( दिलेले पैसे मुकाट्यानं घेत ) मालक, आतल्या खोलीत या छोट्या छोट्या बाटल्या कसल्या आहेत ? ( खिशातून इंजेक्शनची बाटली काढतो. मालक चपापतो. )

मालक : तुला कुठे मिळाली ती ?

सोम्या : आतल्या खोलीत. अशा बऱ्याच बाटल्या आहेत तिथं.

मालक : पण तू तिला हात का लावलास ?

सोम्या : सहज.

मालक : म्हणे सहज. जा, ठेवून दे आधी. जास्त शहाणपणा करू नकोस.

[ मालकाचा हा अवतार प्रथमच पाहिल्यामुळे सोम्या भेदरतो. तो आत जाऊ लागतो, त्याला धरून त्याच्याकडील बाटली मालक घेतो. ]

मालक : पुन्हा कधी आत जाशील तर खबरदार !

सोम्या : पण आता तुम्हीच मला तिथे लपायला सांगितलंत्....

मालक : चूप ! जास्त बोलू नकोस. कानफटात देईन. मला अक्कल शिकवतोय्. जा.... ( सोम्या जाऊ लागतो. त्याला पकडून ) आणि हे बघ, जे काही तू इथे पाहतोस, त्याबद्दल एक अक्षरही कुठे बोललास तर याद राख. मी सांगीन, ते काम निमूटपणे करत जा. त्यातच तुझा फायदा आहे. स्वतःचं डोकं चालवून काही करायला गेलास तर गोत्यात येशील, लक्षात ठेव.

सोम्या : बरं. ( थोडंसं थांबून ) मालक, त्या बॅगा घेणाऱ्या माणसानं विचारलंय्– उद्या भुशाची किती पोती हवीयत्.

मालक : ( चिडून ) मूर्ख ! हे त्यानं तुला विचारायला सांगितलं ? बरं, बरं. जा तू. सोम्या जातो. तो गेल्याची खात्री होताच ) काय बेअक्कल माणूस आहे हा भुसेवाला ! या पोराजवळ असल्या महत्त्वाच्या गोष्टी बोलतात का ? जर का कुठे बातमी फुटली तर दोघांचाही धंदा बुडेल. साध्या गोष्टीदेखील कळत नाहीत या लोकांना आणि म्हणे धंदा करतायत्. हूं.... ( तावातावाने आत जातो. काळोख होतो. फ्लॅशबॅक संपतो. रंगमंचावर पुन्हा त्या अर्ध्या भागात प्रकाश येतो तेव्हा सोम्या आणि जानू आपापल्या जागी उभे दिसतात. सोम्याचा चेहरा उतरलेला आहे. )

सोम्या : असेच दिवस चालले होते. आईचं दुखणं वाढतच होतं. तिच्या औषधांसाठी पैसे मिळवावे, म्हणून मी हे असलं घाणेरडं काम करत होतो, मनाविरुद्ध. आणि त्यामुळेच मालकाच्या जाळ्यात आणखी गुरफटत होतो. मालकाला माझ्याबद्दल दयामाया मुळीच नव्हती. तो माझ्याकडून काम करून घेतच होता. अशातच एक दिवस–आईचा ताप खूप वाढला. डॉक्टरांना बोलावून आणावं लागलं. तिची तब्येत सुधारण्याचं काहीच लक्षण दिसेना. तरीही तिला शक्ती

येण्यासाठी त्यांनी इंजेक्शन दिलं...आणि....त्या...त्या इंजेक्शननंच तिचा बळी घेतला.

जानू : बाप रे !

सोम्या : कारण त्या इंजेक्शनच्या बाटलीत औषधाऐवजी आपल्या मालकानं भरलेलं रंगीत पाणी होतं....( रडू लागतो. )

जानू : रडू नकोस, सोम्या. मलाही इथे काम करायचं नाही. आपण दोघं मिळून मालकाला चांगला धडा शिकवू या.

सोम्या : ते कसं जमणार ?

जानू : का ?

सोम्या : कारण मालकाची माणसं....

सोम्या : म्हणून काय झालं ? संधी मिळताच मालकाचं खरं रूप उघडकीला आणू या.

[ बाहेर ट्रक आल्याचा आवाज येतो. ]

सोम्या : ट्रक आला वाटतं ! मघाशी सातच्या सुमारास मालकानं एका माणसाला फोन केला होता—ट्रक आणण्यासाठी. त्यावेळी मी इथेच बाहेर उभा होतो. त्याचं बोलणं मी चोरून ऐकलं.

जानू : म्हणजे तो माणूस आलेला दिसतोय्.

[ तो माणूस – दगड्या येतो. ]

दगड्या : भुशाचे खोके कुठायत् ?

सोम्या : कसले ?

दगड्या : भुशाचे ! ऐकायला कमी येतं वाटतं तुला ?

जानू : भुशाचे खोके कुठे आहेत, ते नाही माहीत. पण इथे चहाचे खोके आहेत.

दगड्या : (हसत) तेच ते. भुशाला चहाचा रंग लावून वाळवल्यावर तो चहासारखाच दिसणार. तुमचा मालक चहा म्हणून विकतो तो.

सोम्या, जानू : बाप रे !

दगड्या : चला, आटपा लौकर. एक-एक खोका बाहेर न्या. (सोम्या, जानू खोकं हलवू लागतात.) मी मघाशी केलेला फोन मिळाला ना ? (जानू मान डोलावतो.) मग ? अजून माल इथेच ? फोनवर मालक म्हणाले, सगळं तयार आहे. आणि इथे तर अजून सुरुवात व्हायचीय्. मालक कुठाय् ?

सोम्या : आत आहेत.

जानू : ते पाहा आलेच. (आळस देत मालक बाहेर येतो.)

मालक : काय चाललंय् ? गप्पा कसल्या छाटताय् ? (सोम्या, जानू पुन्हा काम करू लागतात.) दगड्या, ट्रक अगदी वेळेवर आणलास. जा, मागला दरवाजा उघडून घे आणि आतल्या खोलीतले खोके, पोती ट्रकवर चढव. सोम्या, जानू, बघत काय बसलात ? जा, त्याला मदत करा आणि हे खोकेही नेऊन टाका. आटपा लौकर.

[सगळे काम करू लागतात. राजू आपल्या घरात फोन नंबर फिरवतो, त्यामुळे मालकाच्या घरात फोन वाजू लागतो. मालक फोन घेतो.]

मालक : हॅलो....हॅलो....

राजू : हॅलो, कोण बोलतंय् ?

मालक : तू कोण ते सांग आधी ?

['हाच तो आवाज' या अर्थाची खूण राजू आपल्या मित्रांना करतो.]

राजू : (मोठ्या माणसाच्या आवाजात) तू काय तू ? तुम्हाला मी

येतो. )

मालक : तू कसा आलास ?

दगड्या : पोलीस पाठलाग करत होते. एका गल्लीत ट्रक वळवून त्यांना गुंगारा दिला. नंतर झाडीत ट्रक लपवला आणि तुम्हाला सांगायला इकडे आलो.

मालक : बरं केलंस्! पण बातमी कशी फुटली, काही कळत नाही.

[ लपलेल्या सोम्याचा हात त्याला दिसतो. मालक सोम्याला खेचून आणतो. दगड्या जानूला पकडतो. ]

दगड्या : आमचं बोलणं चोरून ऐकता काय ?

मालक : आता का दातखीळ बसली ?

[ दोघेही मुलांना मारू लागतात न लागतात तोच— ]

बाबा : ( प्रवेशून ) हँड्स् अप.

[ त्यांची व मालकाची झटापट होते. कॉन्स्टेबल सोम्या आणि जानूच्या मदतीने दोघांना पकडतो. ]

सोम्या : मीच फोन केला तुम्हाला !

बाबा : बरं केलंस ! ( मालकाला ) धान्यात भेसळ करता काय ? आणि भुशाला रंग फासायला हवा ना तुम्हाला ? चला पोलीसस्टेशनवर. तुमच्या तोंडाला रंग लावू या आपण.

मालक : प....प....

बाबा : पप काय करतोस ? गरीब मुलांना असल्या घाणेरड्या धंद्यात गुंतवायला लाज नाही वाटत तुम्हाला ?

[ सगळे जाताच तिकडे काळोख होतो. राजूच्या घरात प्रकाश. मुलं भांडी वाजवत बाहेर येतात. ]

राजू : चला. आता एकदा गाण्याच्या बँडबरोबर प्रॅक्टिस होऊ दे.

पम्या : पण उगीचच भांडी वाजवू नका.

मिनी : बरं बरं.

नीतू : पुन्हा भांडण !

राजू : पम्या, आजोबा म्हणजे माझे बाबा; कारण मी बाबा !

नीतू : मी आजी होईन. म्हणजे अनूची सासू.

अनू : मी आई !

मिनी : मी आजी– आईची आई.

अभि : आणि मी मास्तर.

[मुलं भांडी वाजवून किचन बँड सुरू करतात व त्यावर गाणे म्हणतात व नाचतात.]

पम्या : होईन मी आजोबा, बाबांचे बाबा होईन
कधी होईन ? कसा होईन ? माहीत नाही !
तरीही आजोबा होईन, बाबांचे बाबा मी होईन
बाबा मला घाबरतील, नमस्कारही रोज करतील.
तरीही येता जाता मी त्यांच्यावर खेकशीन.

[राजूचा कान पकडून पम्या विचारतो—'काय रे, कुठे गेला होतास इतका वेळ ? ही काय यायची वेळ झाली ?']

इतर : कधी होशील ? कसा होशील ?

पम्या : माहीत नाही. तरीही आजोबा होईन.
बाबांचे बाबा मी होईन.

नीतू : होईन मी आजी, आई होईल सून माझी.
काम टाकून बाहेर गेली तर मी रूसून बसीन.

( जमिनीवर बसून रागाने विचारते— 'काय ग हे ? कुठं गेली सूनबाई ? ही कामं कोण उरकणार आता ? येऊ दे तर खरी !' )

इतर : कधी होशील ? कशी होशील ?

नीतू : माहीत नाही. तरीही आजी मी होईन.
आईची सासू मी होईन.

अभि : मास्तर मी होईन, शाळेतले मास्तर मी होईन.
बाबांना शाळेत घेऊन जाईन. ( राजूला अभ्यासाला बसवतो. )
गणितं नसतील केली तर शिक्षा त्यांना करीन.

इतर : कधी होशील ? कसा होशील ?

अभि : माहीत नाही ! तरीही मास्तर मी होईन.
शाळेतले मास्तर मी होईन.

मिनी : आजी मी होईन, आईची आई मी होईन.
आईला माझं ऐकावं लागेल. सांगीन ते ते करावं लागेल.
अभ्यासाला बसवून तिला मी खेळायला जाईन.

इतर : कधी होशील ? कशी होशील ?

मिनी : माहीत नाही ! तरीही आजी मी होईन.
आईची आई मी होईन.

[ गाणे संपताच अनू भांडी गोळा करू लागते. ]

अनू : चला आत. बाहेरच्या खोलीत पसारा ठेवायचा नाही.

[ मुलं जाऊ लागतात. राजू थांबतो. ]

राजू : ए, आज पपू हवा होता नाही ?

पम्या : हो ना. बँड किती छान वाजवला असता त्यानं. कुठे असेल रे तो ?

[ सगळेजण आत जाताच राजूच्या घरावर काळोख. रंगमंचाच्या दुसऱ्या भागाचे नेपथ्य बदलले आहे. ते एक तळघर आहे. आत येण्याचा एकच दरवाजा विंगेत आहे. हे गुदाम असून त्यात मोडकळीस आलेले एक कपाट दिसत आहे. या भागावर प्रकाश येताच 'जा आत' असे ओरडणे ऐकू येते आणि त्यानंतर धाडकन् दार वाजल्याचा आवाज येतो. दोन मुले येतात. एक ८-१० वर्षांचा व दुसरा १२-१३ वर्षांचा—पपू आणि अनिल. अनिलचा पाय वाकडा आहे. ]

पपू : तू मला कुठे आणलंस ? हे कुणाचं घर आहे ?

अनिल : झिपऱ्याचं !

पपू : झिपऱ्याचं ? झिपऱ्या कोण ?

झिपऱ्या : ( प्रवेशून ) मी झिपऱ्या ! ( पपूला मारायला जातो. )

अनिल : त्याला मारू नकोस.

झिपऱ्या : थांब तुलाही मारतो. ( मुलं भीतीने कोपऱ्यात उभी राहतात.) मी जेवायला जातोय्. तुम्ही थांबा इथंच.

अनिल : आम्हाला काहीतरी खायला आण. आम्हाला पण भूक लागलीय्.

झिपऱ्या : भूक लागलीय् म्हणे ? बसा इथेच.

अनिल : आम्ही येतो ना तुझ्याबरोबर.

झिपऱ्या : इथे बसा म्हणतोय् ना ?

अनिल : मग येताना आमच्यासाठी खायला तरी आण.

झिपऱ्या : ( चिडवत ) आणतो हं. तुम्हाला खायला आणतो. जा बसा तिकडे. ( मुलं त्याच्यापाठी जाऊ लागतात. त्यांना ढकलून देत ) जास्त आगाऊपणा करू नका. दरवाज्याला कुलूप लावतोय् मी.

( झिपऱ्या जातो. दार लावल्याचा आवाज ऐकू येतो. पपू त्याच्या-पाठोपाठ जाऊन निराश होऊन परत येतो. )

पपू : आपल्याला कोंडलं रे त्यानं! ( अनिल पैसे मोजत असलेला पाहून ) पैसे? कसले रे हे पैसे?

अनिल : आज माझी कमाई किती झाली, माहीत आहे?

पपू : कमाई? आणि तुझी?

अनिल : हो. माझी. कमाई म्हणजे भीक मागून मिळतात ते पैसे.

पपू : म्हणजे? तू भीक मागतोस?

अनिल : मला नाही आवडत, पण झिपऱ्या मागायला लावतो. एखाद्या ठिकाणी बसवतात मला आणि जवळच कुठे तरी उभं राहून माझ्यावर नजर ठेवतात.

पपू : आज किती पैसे मिळाले तुला?

अनिल : अडीच रुपये! ते सुद्धा माझी जागा बदलली, म्हणून.

पपू : जागा बदलली म्हणजे?

अनिल : म्हणजे असं की, मी मुंबईत आल्यापासून...

पपू : म्हणजे तू मुंबईचा नाहीस?

अनिल : छे! माझं घर रत्नागिरीला आहे. मुंबईची मला नीटशी माहिती देखील नाही.

पपू : मुंबईत आल्यापासून भीकच मागतोयस्?

अनिल : हो ना. कालपर्यंत मला एका स्टेशनजवळ बसवायचे. तिथले जाणारेयेणारे लोक मला ओळखू लागले, म्हणून आज जागा बदलली माझी.

[ अनिल बसू लागतो, तो पडतो, जोरात कळवळतो. ]

पपू : खूप दुखतो तुझा पाय?

अनिल : हो ना. उठता बसताना खूप त्रास होतो. तरी बरं पहिल्यापासूनच माझा पाय वाकडा आहे. नाहीतर...

पपू : नाहीतर काय ?

अनिल : नाहीतर या गुंडांनी काहीतरी केलं असतं. परवा त्या झिपऱ्याचं बोलणं ऐकलं मी. म्हणाला– 'पोराचा पाय आधीपासूनच वाकडा आहे, ते बरं आहे. नाहीतर 'आप्रेशन' करून वाकडा केला असता.' आणि नंतर असा जोरदार हसला की भीतीनं माझ्या अंगावर काटाच उभा राहिला.

पपू : ऑप्रेशन ?

अनिल : हो ऑप्रेशन. म्हणजे माझ्या पायाचं काहीतरी बरंवाईट करायचा त्याचा विचार होता. म्हणाला– 'एखादा पाय वाकडा, हात थोटा, डोळा तिरळा असला म्हणजे कुणीही माणूस पटकन भीक घालतो.'

पपू : बाप रे ! म्हणजे या लोकांना जास्त पैसे मिळावे म्हणून हे आपल्याला लंगडं, थोटं करणार ?

अनिल : हो ना.

पपू : मला तर बुवा भीती वाटते.

अनिल : मला वाटतंय्, आज झिपऱ्याला तसंच काहीतरी करायचंय. म्हणून त्यानं मला तुला इकडे घेऊन यायला सांगितलं. सकाळी मला तो म्हणाला– 'आज तू, मी आणि पपू माहीमला जाऊ या, रात्री.' आणि म्हणूनच आता आपल्याला या घरात झिपऱ्याच्या मित्रांनी आणून सोडलं.

पपू : त्या माणसानं चावीनं दार उघडलं तेव्हाच मला वाटलं की तो झिपऱ्याचा साथीदार आहे. पण अनिल, आपण इथून सुटायचा मार्ग शोधायला हवा.

अनिल : हो ना. मला इथे आणल्याला १० दिवस झाले.

पपू : पण तुला मुंबईला कशाला आणलं ?

अनिल : मग काय, रत्नागिरीलाच ठेवणार ? अरे गावातले लोक मला ओळखतील म्हणून इकडे आणलं.

पपू : म्हणजे मलाही मुंबईत ठेवणार नाहीत आता, दुसरीकडे पाठवणार ?

अनिल : मलाही तेच वाटतंय्. काहीतरी 'दिल्ली दिल्ली' म्हणत होते.

पपू : नको रे बाबा. एकदा दिल्लीला नेऊन टाकलं की माझा तपास मुंबईत लागणं कठीणच. माझे आईबाबा...

अनिल : माझे आईअण्णा किती काळजी करीत असतील !

पपू : माझी आई तर जेवलीही नसेल. कार्निव्हलमध्ये हात सोडू नको म्हणून तिनं कितीदा बजावलं. पण मी जास्त धीटपणा दाखवायला गेलो आणि फसलो. तुला कसं पळवलं रे या लोकांनी ?

अनिल : गावातल्या जत्रेला मी गेलो होतो तेव्हा भूल घालून झिपऱ्यानं मला पळवलं. (एवढ्यात फोन वाजू लागतो.) कसला रे आवाज ?

[पपू कान देऊन ऐकतो.]

पपू : मला वाटतं, फोनचा आहे तो आवाज.

अनिल : पण फोन तर इथे कुठे दिसत नाही.

पपू : आत असेल. एवढा दुरून आल्यासारखा आवाज येतोय् म्हणजे आतल्या खोलीतच असणार.

अनिल : पण तेवढ्यात झिपऱ्या आला तर ?

पपू : अरे, तो आला तर कुलूप उघडल्याचा आवाज होईल ना. (बोलत बोलत आत जातो. मान हलवत परत येतो.)

अनिल : आत नाहीये फोन ?

पपू : ऊं हूं. कुठं असेल बरं ? ( शोधाशोध करू लागतात. अचानक कपाटापाशी पपू थांबतो. ) अरे, इथूनच आवाज येतोय. ( फोनचा आवाज बंद होतो. ) छे, बंद झाला !

अनिल : पण कपाटात फोन ? ( फोन पुन्हा वाजू लागतो. )

पपू : बघू तरी. ( कपाट उघडण्याचा प्रयत्न करतो. पण ते उघडत नाही. ) छे ! तू बघ जरा.

अनिल : ऊं हूं. आता काय करायचं ? चल, दोघे मिळून उघडू या.

[ दोघेजण कपाटाचं दार ओढू लागतात. कपाट एकदम सरकतं. आणि त्याच्या मागच्या बाजूला शेल्फमधे लपवलेला फोन दिसतो. ]

पपू : बाप रे ! म्हणजे पुढे कपाट आणि मागे फोन ! ( फोन उचलतो ) छे, डिसकनेक्ट झाला. ( फोन ठेवतो. )

अनिल : आता ?

पपू : आयडिया ! मी फोन करतो !

अनिल : पण कुणाला ?

पपू : हे बघ, तू दाराशी थांब. कुलूप काढल्याचा आवाज झाला तर मला खूण कर.

[ अनिल दाराजवळ उभा राहतो. पपू फोन नंबर फिरवतो. राजूच्या घरात फोन वाजू लागताच प्रकाश. अनू फोन घेते. ]

अनू : हॅलो, कोण बोलतंय् ?

पपू : अनू, मी पपू बोलतोय् !

अनू : पपू ? कुठून बोलतोयस् तू ? राजू, पपूचा फोन !

[ सगळी मुलं आतून धावत येतात. ]

राजू : ( फोनवर ) हॅलो ..

पपू : राजू, मला गुंडांनी पळवून आणलंय्. पंधरा-वीस मिनिटांत मला इथून माहीम कॉजवेला घेऊन जाणार आहेत आणि तिथून दिल्लीला पाठवणार आहेत.

राजू : बाप रे! दिल्लीला? बरं, तू कुठून बोलतोयस्?

पपू : लिहून घे लौकर. १३६, मनीषा अपार्टमेंटस्, चितळे रोड. (राजू पत्ता लिहून घेतो.) राजू, ही बिल्डिंग बाहेरून दिसायला एकदम मस्त आहे. त्यामुळे तुम्हाला वाटेल की इथे कुठे मुलांना कोंडून ठेवणार? पण तसं समजू नका. आणि हे बघ, माझ्याबरोबर अनिल नावाचा एक मुलगा आहे. इथला फोन नंबर घे– ४५८३२६!

राजू : (नंबर लिहून घेत) तू मुळीच घाबरू नको.

पपू : बरं. माझ्या आईला सांग, माझा फोन आला होता म्हणून.

राजू : हो सांगतो.

[पपू फोन ठेवतो. त्या भागात काळोख.]

राजू : पपू आणि अनिल नावाचा एक मुलगा गुंडांच्या तावडीत आहेत. पंधरा-वीस मिनिटांत त्यांना माहीम कॉजवेला नेणार आहेत आणि तिथून दिल्लीला पाठवून देणार आहेत.

नीतू : आपण त्यांना सोडवलंच पाहिजे. (राजू फोन नंबर फिरवतो.)

मिनी : कोणाला फोन करतोयस्?

राजू : बाबांना! (फोनवर) हॅलो, पोलीस स्टेशन?

आवाज : (माईकवरून) येस्!

राजू : इन्स्पेक्टर देशमुख आहेत का?

आवाज : स्पीकिंग!

राजू : बाबा, मी राजू बोलतोय्. पपू सापडला. त्याचा फोन आला होता. मी पत्ता सांगतो, तो लिहून घ्या आणि लगेच तिकडे जा.

कारण पंधरा-वीस मिनिटांत त्याला दिल्लीला पाठवणार आहेत. हं, पत्ता...१३६ मनीषा अपार्टमेंट्स्, चितळे रोड. बाबा, पपूबरोबर अनिल नावाचा एक मुलगा आहे. पण, तुम्ही लौकर जा तिकडे.

आवाज : मी बघतो काय करायचं ते ! ( राजू फोन ठेवतो. )

मिनी : काय म्हणाले तुझे बाबा ?

राजू : ते म्हणाले, बघता काय करायचं ते !

नीतू : पण तू त्यांना माहीम कॉजवेला जायला सांगायचंस.

पम्या : बावळे, माहीम कॉजवेला म्हणजे नक्की कुठे ते आपल्याला माहीत होतं का ?

राजू : हो ना. आणि तेवढ्या वेळात ते गुंड पपूला घेऊन पळाले असते.

[ बोलत बोलत मुलं आत जातात. काळोख. तळघरात प्रकाश. कपाट पूर्ववत्. अनिल, पपू बसले आहेत. झिपऱ्या व रंग्या येतात. ]

झिपऱ्या : रंग्या, हीच ती पोरं !

रंग्या : ठीक आहे. आता नेतो त्यांना माहीमला आणि तिथून पळतो दिल्लीला.

झिपऱ्या : अनिल, आजची कमाई ?

[ अनिल पैसे देऊ लागतो. रंग्या 'थांब' असे ओरडत झिपऱ्याच्या अंगावर धावून जातो. ]

रंग्या : हात लावू नकोस त्या पैशांना.

झिपऱ्या : का ?

रंग्या : ते पैसे माझे आहेत. आपलं काय ठरलं होतं ? दादरपलीकडे बसणारी मुलं तुला पैसे देणार आणि अलीकडे बसतील ती मला. आज अनिल माझ्या हद्दीत बसला होता.

झिपऱ्या : पण त्याला मी बसवलं होतं.

रंग्या : पण ते माझ्या हद्दीत... ( हे भांडण चालू असताना अनिल आणि पपू पळून जातात. ते लक्षात येऊन ) अरे, ती पोरं कुठं गेली?

झिपऱ्या : पळाली वाटतं !

[ दोघे बाहेर धावत जातात. काळोख. राजूच्या घरात प्रकाश. मुलं बोलत बोलत बाहेर येतात. ]

नीतू : पण राजू, तुझ्या बाबांना तिथे पोचायला उशीर झाला तर ?

राजू : आयडिया !

मिनी : कसली ?

राजू : मघाचची !

मुलं : हां.

[ राजू फोन नंबर फिरवतो. झिपऱ्या व रंग्या मुलांना घेऊन येताच तळघरात प्रकाश. ]

रंग्या : पळून जाता काय ?

[ झिपऱ्याकडे फोन वाजू लागतो. झिपऱ्या फोन घ्यायला पुढे जातो. रंग्या अनिल व पपूला धरून उभा आहे. ]

झिपऱ्या : ( फोनवर ) हॅलो, कोण बोलतंय् ?

राजू : तुम्ही कोण ते सांगा आधी.

झिपऱ्या : गुमान सांगता की नाही तुमचं नाव ?

राजू : नाही सांगत जा. काय कराल ?

झिपऱ्या : काय करीन ? समोर या म्हणजे दाखवतो काय करीन ते !

राजू : पण, फोन तुमच्यासमोर आहे म्हणजे मीही तुमच्या समोर आहे.

झिपऱ्या : जास्त बटवट नकोय्. कोण पायजे ते बोला.

राजू : तुम्हीच !

झिपऱ्या : मी ?

राजू : हो तुम्हीच. तुम्ही कोण आहात ते मला माहीत आहे.

झिपऱ्या : काय ? म्हणजे तुम्ही मला ओळखता ?

राजू : हो. तुम्ही कोण आहात, ते मला माहीत आहे आणि तुम्ही काय केलंत ते आम्ही पाहिलंय्.

झिपऱ्या : मी काय केलं ते तुम्ही पाहिलंय् ? म्हणजे वाट लागली.

राजू : वाट लागली ना ? बरं झालं.

झिपऱ्या : चूप. कानफटात देईन.

राजू : द्या द्या. कान जवळच आहे फोनच्या.

झिपऱ्या : पण मी इथे काय केलं, ते तुम्हाला कसं कळलं ?

राजू : तुम्हाला काय करायचंय् ?

[ राजू फोन ठेवतो. मुलं आत जातात. काळोख. झिपऱ्याकडे दाराची कडी वाजते. त्याबरोबर तो फोन दडवतो. रंग्या लपतो. झिपऱ्या दार उघडायला जातो. एक म्हातारा माणूस येतो. झिपऱ्या आत येतो व त्यांच्याकडे पाठ करून उभा राहतो. ]

म्हातारा : रणदिवे इथे राहतात का ?

पपू : रणदिवे वरच्या मजल्यावर राहतात. मघाशीच पाटी वाचली मी, येताना.

म्हातारा : थँक यू. तुझं नाव काय बाळ ?

पपू : ( घाबरत घाबरत ) पपू.

म्हातारा : ( अनिलला ) आणि तुझं रे ?

अनिल : ( झिपऱ्याकडे बघत ) अनिल.

म्हातारा : वा वा. रणदिवे वरच्या मजल्यावर राहतात का ?

[ ते जातात. झिप्र्या दार लावून येतो. ]

रंग्या : (बाहेर येत) हा म्हातारा कशाला आला होता ?
पपू : पत्ता शोधायला !
रंग्या : चूप. तुझ्याकडून शिकायचं नाही मला ते.

[ पुन्हा दाराची कडी वाजते. धावपळीत झिप्र्या लपतो आणि रंग्या दार उघडतो. पुन्हा म्हातारा येतो. ]

रंग्या : एकदा सांगितलं ना, रणदिवे इथं राहात नाहीत.
म्हातारा : माझं तुमच्याकडेच काम होतं.
रंग्या : पण मी तुम्हाला ओळखत नाही.
म्हातारा : पण मी तुम्हाला चांगलाच ओळखतो. जरा इकडे येता ? मुलांसमोर सांगण्यासारखं काम नाही ते. (रंग्या पुढे जाताच त्याला धरून) कॉन्स्टेबल, याला ताब्यात घ्या.

[ झिप्र्या पुढे येतो आणि पपूला धरतो. अनिल आपल्या हातातल्या काठीने त्याच्या हातावर मारतो. पपू सुटतो. इन्स्पेक्टर म्हणजे म्हातारा झिप्र्याला धरतात. ]

इन्स्पेक्टर : मुलं पळवता काय ?
अनिल : पण आजोबा, तुम्हाला कसं कळलं इथे गुंड आहेत म्हणून ?
इन्स्पेक्टर : मघाशी तुमची नावं विचारून मी खात्री करून घेतली.
पपू : पण तुम्हाला इथला पत्ता कोणी दिला ?
इन्स्पेक्टर : राजूनं !
पपू : राजूनं ? हां, हां...राजूनं....पण...म्हणजे तुम्ही राजूचे बाबा ?

[ या वेळेपर्यंत म्हाताऱ्यानं पागोटं आणि खोट्या मिशा काढल्या आहेत. ]

इन्स्पेक्टर : हो, मीच. राजूचे बाबा. वेषांतरामुळे ओळखता आलं नाही ना ? चला, निघू या.

पपू : हो. पण उद्याच्या प्रदर्शनाचं काय ?

इन्स्पेक्टर : सगळे तुझीच वाट बघतायत. आणि अनिल, तू मुळीच घाबरू नकोस. आपण तुझी रत्नागिरीला जायची व्यवस्था करू या. चला. ( मुलांना घेऊन जात असतानाच— )

पडदा

म. ग्रं. सं. ग्रंथालय शाखा.
क्र. ९३३९ दि. २९/९/७२
विभाग बा-वा

# अंक तिसरा

[ रंगमंचावरील राजूचं घर त्याच स्थितीत दिसतं. रंगमंचाच्या दुसऱ्या भागात एका जुन्या परंतू त्या काळी ऐश्वर्यसंपन्न असलेल्या वाड्याचा दिवाणखाना दिसतो. दिवाणखान्यात दोन मोठ्या खुर्च्या, त्यांच्या पुढ्यात टीपॉय, एक-दोन फोल्डिंग खुर्च्या आणि फोन ठेवलेले उभे टेबल दिसते. दिवाणखान्यास दोन दरवाजे. बाहेरून येण्याच्या दरवाजास कडी आहे, तो बंद आहे. पडदा उघडतो तेव्हा राजूच्या घरात काळोख. दुसऱ्या भागावर प्रकाश. टीपॉयजवळील एका खुर्चीवर एक म्हाताऱ्या बाई— गिरिजाबाई वाचत बसलेल्या दिसतात. दरवाजावरची बेल वाजते. ]

गिरिजाबाई : नारायणा, ए नारायणा. बघ जरा, कोण आलंय् ते !

[ आतून नारायण–गिरिजाबाईंकडचा गडी येतो आणि दाराची कडी काढतो. दारात वकील उभे दिसतात. ]

वकील : नमस्कार वहिनी.

[ नारायण आत जातो. वकील आत येतात. ]

गिरिजाबाई : या भावजी.

वकील : ( बसत ) आज अचानक बोलावणं पाठवलंत ! काही विशेष ?

गिरिजाबाई : विशेष काही नाही ! म्हटलं, जे काही करायचंय् त्याचा कच्चा आराखडा आज ठरवू या. म्हणजे तुम्हाला कागदपत्रं तयार करायला बरं. लेखी व्यवहार एक-दोन आठवड्यांत आटपू.

वकील : तुम्ही म्हणाल तसं ! बरं, तुमची एकूण मालमत्ता तीन

लाखाची. बरोबर आहे ना ?

गिरिजाबाई : हो. बँकेतले एक लाख, जवळजवळ पंचाहत्तर हजारांचं सोनंनाणं आणि उरलेली सगळी जमीन !

वकील : पण तुम्हाला या सगळ्या व्यवहाराची एवढी घाई का ?

[ आतून मोहन येतो. अंगात भडक रंगाचे कपडे. एकूण अवतार तेथील वातावरणाशी विसंगत. ]

गिरिजा : आता माझे तरी किती दिवस राहिलेत ?

वकील : असं कसं म्हणता वहिनी ?

मोहन : तुम्ही फालतू प्रश्न विचारू नका, तुमचं काम करा गुपचूप. मावशी, मी जाऊन येतो.

गिरिजा : बरं. ( मोहन जातो. ) हे बघा भावजी, मी गेल्यावर ही संपत्ती कुणा सोम्यागोम्याच्या हाती जाण्यापेक्षा एखाद्या चांगल्या संस्थेला देणगी म्हणून दिलेली बरी.

वकील : पण, त्या देणगीबद्दल तर तुम्ही जाहीरच करून टाकलंय् !

[ राजूनं फोन नंबर फिरवल्यामुळे गिरिजाबाईकडचा फोन वाजू लागतो. ]

गिरिजा : नारायण, फोन बघ कुणाचा आहे तो. ( नारायण येऊन फोन घेतो. )

नारायण : हॅलो !

राजू : गिरिजाबाई गुप्त्यांचं घर का ? मी राजू बोलतोय्.

नारायण : हो. हो. मी त्यांचा नोकर नारायण बोलतोय्.

राजू : गिरिजाबाई आहेत का ?

नारायण : आहेत. थांबा हं. बाई, त्या प्रदर्शनवाल्या मुलांचा फोन.

[ गिरिजाबाई उठून फोन घेतात. ]

गिरिजा : राजू, मी बोलतेय. हे बघ, मी आता कामात आहे. जरा वेळानं फोन करशील ?

राजू : हो. दहा वाजता चालेल ? ( राजू घरात गेल्यावर त्या भागात काळोख. )

गिरीजा : हो. ( फोन ठेवतात व पुन्हा वकिलाशी बोलू लागतात. ) हं, तर मी जाहीर केलंय् ते पैशाबद्दल; ते मी अपंग मुलांसाठी देणार आहे. पण आमच्या जमिनीचं काय करायचं, ते मी सांगितलंच नाहीये.

वकील : मग ? काय करणार आहात जमिनीचं ?

गिरिजा : तीसुद्धा देऊन टाकणार आहे एखाद्या संस्थेला. पण खंडाळ्याला जमीन आहे, तेव्हा एखाद्या हॉस्पिटलला किंवा सॅनिटोरियमला दिलेली बरी. म्हणजे पेशंटांच्या तब्येती सुधारायला चांगलं हवामान तरी असेल तिथं.

वकील : वा, बराच बारीकसारीक विचार केलेला दिसतोय् तुम्ही !

[ मोहन बाहेरून येऊन पुन्हा आत जातो. ]

गिरिजा : म्हणजे काय ? एवढ्या इस्टेटीची उस्तवार करायची, ती नीटपणे व्हायला नको ? आता राहिलं सोनंनाणं. मी गेल्यावर ते सगळं विकायचं आणि त्यातून मिळालेला पैसा त्या हॉस्पिटलच्या चालकांना द्यायचा हॉस्पिटल चालवण्यासाठी.

वकील : बरं. आता मी त्या संस्थांच्या नावे कागदपत्रं करतो.

गिरिजा : सावकाश करा. ती नावं मी तुम्हाला परवाच दिलीयत्.

वकील : पण तुमचे ट्रस्टी, विश्वस्त म्हणून कोणी ?

गिरिजा : ते नंतर बघता येईल. आधी एवढं काम आटपू या.

वकील : बरं. मी निघतो. ( जातात. )

नारायण : ( आतूनच ) बाई, जेवायला येताय् ना ?

गिरिजा : आले रे बाबा. ( आत जाऊ लागतात तोच )

मोहन : ( प्रवेशून ) थांब मावशी.

गिरिजा : काय रे मोहन ?

मोहन : नाही, तसं विशेष काही नाही. पण, मला तुझ्याशी काही बोलायचंय्.

गिरिजा : तुझ्या इंटरव्ह्यूचं काय झालं ?

मोहन : नेहमीसारखंच ! अर्धवट शिक्षणावर कोण नोकरीवर घेणार ?

गिरिजा : नीट शिकला असतास तर ही वेळ आली नसती.

मोहन : तू त्याच त्याच गोष्टी पुन्हा उगाळायला लागलीस.

गिरिजा : बरोबरच आहे ते ! दिवसभर उनाडक्या करायच्या आणि मग नोकरी मिळत नाही म्हणून रडत बसायचं, याला काय अर्थ आहे ?

मोहन : या बाबतीत तू मला बोलू नकोस.

गिरिजा : का ? का नको बोलू ? तुला एवढा मोठा केलाय् तेव्हा बोलायचाही हक्क आहे मला.

मोहन : तुझ्या इस्टेटीचं तू काय करणारेस ?

गिरिजा : माझ्या पैशाचं मी काहीही करीन. त्याची तू मुळीच काळजी करू नकोस.

मोहन : मघाशी त्या वकिलाबरोबर झालेलं तुझं बोलणं मी ऐकलंय्.

गिरिजा : ऐकलंस ना ? मग पुन्हा कशाला विचारतोस ?

मोहन : त्यातून मला काय देणार आहेस तू, ते बोलली नाहीस. म्हणून विचारतोय्.

गिरिजा : ह्याचं उत्तरच हवंय् ना तुला ? मग ऐक. तुझ्यासारख्या खुशालचेंडू मुलाला माझ्या इस्टेटीतून एक कपर्दिकही मिळणार नाही.

मोहन : एवीतेवी तुझ्यानंतर सगळं मलाच मिळणार आहे, तेव्हा आधीच का माझ्या नावानं करत नाहीस ?

गिरिजा : मी एकदा नाही म्हटलंय् ना? पुन्हापुन्हा विचारू नकोस. जा.

मोहन : कशी देत नाहीस, तेच बघतो. (तणतणत बाहेर जातो.)

गिरिजा : म्हणे तुझ्यानंतर सगळं मलाच मिळणार! लहानपणीच आईवडील गेले म्हणून माझ्याकडे आणून मोठा केला, त्याचे चांगले पांग फेडतोय. म्हणतात– 'माय मरो नी मावशी जगो.' पण हा तर मावशीच्याही जिवावर उठलाय्.

नारायण : (येऊन) बाई, जेवायला येताय् ना?

गिरिजा : चल बाबा. (आत जाऊ लागतात. बाहेरून मोहन येतो.)

मोहन : मग, काय ठरलं तुझं?

गिरिजा : हे बघ मोहन, उगाच क्षुल्लक गोष्टींवरून मला त्रास देऊ नकोस. माझा निर्णय पक्का आहे. त्यात मुळीच बदल व्हायचा नाही.

मोहन : पुन्हा विचार कर.

गिरिजा : मी एकदा जे सांगितलंय् तेच माझं उत्तर आहे. तुझ्या हातात पैसे देऊन तू ते उधळण्यापेक्षा अपंग, अनाथ मुलांच्या उपयोगी पडले, तर ते जास्त बरं.

मोहन : मग, नाही ऐकत तू?

गिरिजा : तू माझं ऐकायचंस् का मी तुझं? जा, चालता हो.

मोहन : काळ्या, इकडे ये. (बाहेरून एक गुंड येतो, हातात दोरी घेऊन.)

गिरिजा : काळू, तू?

मोहन : होय काळूच.

गिरिजा : म्हणजे माझ्याच घरात नोकर म्हणून राहून माझ्यावर उलटलास?

मोहन : जास्त बडबड नकोय् मला. काळ्या, बघतोस काय? बांधून टाक तिला.

गिरिजा : नारायण...नारायण...( नारायण धावत पुढे येतो. मोहन त्याला धरतो. काळ्या त्याचे हातपाय बांधतो.) मोहन, अशी बळजबरी केलीस तरी माझी इस्टेट मी तुझ्या नावानं मुळीच करायची नाही.

मोहन : चूप. ( राजूनं फोन नंबर फिरवल्यामुळे गिरिजाबाईंकडचा फोन वाजू लागतो. मोहन फोन उचलतो. राजूच्या घरात प्रकाश. )

राजू : हॅलो, गिरिजाबाई आहेत का ?

मोहन : आहेत.

राजू : त्यांना जरा फोन देता ?

मोहन : नाही.

राजू : त्यांनी फोन करायला सांगितला होता मला, म्हणून मी फोन केला. जरा प्लीज, बोलवा ना.

मोहन : नाही. त्या झोपल्या आहेत. ( गिरिजाबाई 'वाचवा, सोडवा' असं ओरडतात. त्याबरोबर मोहन फोन आदळतो. ) काळ्या, तोंड बांधून टाक तिचं.

[ काळ्या गिरिजाबाईंचं तोंड बांधू लागतो. राजू दोन-तीन वेळा 'हॅलो' करून निराश होऊन फोन ठेवतो. गिरिजाबाईंच्या घरात काळोख. राजूच्या घरात मुलं धावत राजूजवळ येतात. ]

राजू : छे !

मिनी : काय रे, काय झालं ?

राजू : आता मी गिरिजाबाईंकडे फोन केला. कुणीतरी माणूस बोलत होता. पण गिरिजाबाईंना फोनच देईना तो.

अनू : का ?

राजू : तो म्हणाला की त्या झोपल्या आहेत. आणि त्याच वेळी कुणी-तरी बाई ओरडल्याचा आवाज आला.

अभि : काय ओरडल्या त्या बाई ? काही कळलं ?
राजू : वाचवा, सोडवा– असं काहीतरी.
पम्या : मला हे लक्षण काही ठीक दिसत नाही.
नीतू : मलाही ! मला वाटतंय्, गिरिजाबाईंच्या घरात नक्कीच चोर शिरले असावेत.
अभि : काही का असेना. आपण त्यांना सोडवलंच पाहिजे.
राजू : आयडिया !
पम्या : कसली ?
राजू : मघाचची !
मुलं : हां !

[ राजू फोन नंबर फिरवतो. गिरिजाबाईंकडे प्रकाश. फोन वाजू लागतो. नारायणला आत नेऊन टाकले आहे. आणि दरवाज्याला कडी घातली आहे. ]

मोहन : ( बाहेर येऊन फोन घेत ) हॅलो...
राजू : हॅलो, गिरिजाबाई आहेत का ?
मोहन : हे पहा, मघाशी मी तुम्हाला एकदा सांगितलं की त्या झोपल्या आहेत. पुन्हा पुन्हा त्रास देऊ नका.

[ गिरिजाबाई सुटण्यासाठी धडपड करतात. ]

राजू : हे पहा, उगाच ओरडू नका. माझे कान चांगले शाबूत आहेत. तुम्ही कोण आहात ते मला माहीत आहे आणि तुम्ही काय केलंत ते आम्ही पाहिलंय्.
मोहन : कुणाला दम देता ?
राजू : तुम्हाला ! तुमच्यासारख्या चोराला !
मोहन : च...च...चोराला !

राजू : ( मित्रांना 'चोर सापडला' अशी खूण करत ) हो हो चोराला! तुम्हाला काय वाटलं—घरामधे आहात म्हणून तुम्ही केलेली कोणतीही गोष्ट सहज लपेल?

मोहन : प...प....

राजू : ततपप करू नका. तुम्ही कोण आहात ते मला माहीत आहे, आणि तुम्ही काय केलंत ते आम्ही पाहिलंय्.

मोहन : बाप रे! ( मटकन् खाली बसत ) पण...पण...तुम्ही कोण?

राजू : तुम्हाला काय करायचंय्?

[ राजूने फोन ठेवताच त्याच्या घरात काळोख. राजू विचार करत एकटाच बसतो. मुलं आपापसात काहीतरी ठरवू लागतात. गिरिजाबाईंच्या घरात मोहन चार-पाच वेळा 'हॅलो....हॅलो' करून निराश होऊन फोन ठेवतो. ]

मोहन : ( खेकसत ) काळ्या, बघत काय बसलास शुंभासारखा? बातमी कशी फुटली?

काळ्या : कसली बातमी? मला काहीच माहीत नाही.

मोहन : खोटं बोलतोस?

काळ्या : खोटं बोलून मी काय करणार, साहेब? पण साहेब, फोन कुणाचा होता?

मोहन : ते मला माहीत असतं तर तुला विचारलं असतं?

काळ्या : साहेब, मला वाटतं हे त्या पोरांचंच काम असावं.

मोहन : पोरं? कुठली पोरं?

काळ्या : बाईसायबांना उद्या कसल्यातरी कार्यक्रमाला बोलावलंय् त्या पोरांनी! ( आठवून ) हां साहेब, प्रदर्शनाला!

मोहन : प्रदर्शन? कसलं प्रदर्शन? मला तर यातलं काहीच माहीत नाही. पण काय रे, तुला कसं कळलं?

काळ्या : ती पोरं परवा आमंत्रण देऊन गेली, तेव्हा मी इथेच होतो. केर काढीत होतो. (आठवून) त्या पोरांनी कसलंतरी कार्ड दिलं बाईंना. ते टेबलावर ठेवलं होतं. थांबा, बघतो ते.

[दोघेजण टेबलावर कार्ड शोधतात, ते मिळताच– ]

मोहन : वा ! काम करताना आजूबाजूला बरंच बारीक लक्ष असतं तुझं ! शाबास. (कार्डावरचा पत्ता वाचत) सुप्रभा हाऊसिंग सोसायटी, नाचणकर रोड. म्हणजे, इथे जवळच आहे की ! म्हणजे त्या मुलांना नक्कीच आपल्या प्लॅनचा सुगावा लागलेला दिसतोय्. तेव्हा लौकरात लौकर मिळेल ती चीजवस्तू घेऊन इथून पळावं हे उत्तम. ठीक आहे. तू आत जा आणि कपाटंबिपाटं बघायला सुरुवात कर. मी आलोच.

[काळ्या आत जातो. मोहन स्वतःशीच काहीतरी ठरवून त्याच्या मागोमाग जातो. काळोख. राजूच्या घरात प्रकाश. राजू एकटाच विचार करतोय्. इतरांचं लक्ष त्याच्याकडेच आहे.]

अभि : काय राजू, कसला विचार चाललाय् ?

[राजू गडबडीने उठून फोन नंबर फिरवतो.]

अनू : आता कुणाला फोन ?

राजू : कुणाला म्हणजे ? बाबांना !

मुलं : हां !

राजू : (फोनवर) हॅलो...पोलीस स्टेशन ?

आवाज : (माईकवरून) हो.

राजू : मला इन्स्पेक्टर देशमुखांशी बोलायचंय्.

आवाज : इन्स्पेक्टर देशमुख महत्त्वाच्या कामासाठी बाहेर गेलेत.

राजू : कधी येतील ?

आवाज : तसं काही सांगितलं नाहीये.

राजू : ठीक आहे. ते आल्यावर त्यांना सांगा की राजूचा फोन आला होता म्हणून. ( फोन ठेवतो. )

नीतू : काय रे ?

राजू : गिरिजाबाईंना मदत करावी म्हणून मी बाबांना फोन केला, तर ते बाहेर कामावर गेलेत.

अभि : आता रे काय करायचं ?

राजू : आयडिया ! पम्या, तू माझ्याबरोबर चल.

पम्या : अरे पण कुठे ?

[ पम्याला घेऊन राजू जातो. त्याच्यापाठी 'अरे थांबा. कुठे चाललात ?' असं विचारत अनू, अभि, नीतू, मिनी जातात. पण परत येतात. ]

अनू : हे असे अचानक कुठे गेले ?

मिनी : हो ना, रात्रीच्या वेळी ! आणि आपल्याला कोणालाच बरोबर घेतलं नाही.

नीतू : शिष्ठच आहेत. आयडिया ! मिने, तू आणि मी त्यांच्या पाठलागावर जाऊ या.

मिनी : चल. अनू, तू येतेस ?

अनू : नको ग बाई. घरात कुणीच नाही. राजूही आता बाहेर गेलाय. आणि....

[ मिनी, नीतू धावतात. अनू, अभि त्यांना थांबवायला जातात. तेवढ्यात दार लागते. अनू, अभि बाहेर राहतात. मधल्या खिडकीवर प्रकाश. तिथे राजूचे बाबा—इन्स्पेक्टर देशमुख फोन हातात घेऊन उभे दिसतात. राजूकडे फोन वाजतो. ]

बाबा : काय आहे काय ? घरात कोणीच कसं नाही ? मुलं कुठे गेली ?

[ राजूच्या घरात ढमढेरेकाकू हातातला किल्ल्यांचा जुडगा फिरवत येतात. ]

काकू : राजू , अनू... ( आतल्या दाराशी जातात. ) अनू....राजू.... अग्गोबाई, फोन वाजतोय्. पण ही मुलं गेली तरी कुठं ? फोनच घ्यावा ( फोन घेतात. लाडिकपणे ) हॅलो, कोण बोलतंय् ?

बाबा : मी इन्स्पेक्टर देशमुख बोलतोय्.

काकू : ( घाबरून ) मी ..मी ढमढेरेकाकू बोलतेय् !

बाबा : अहो, मुलं कुठं गेलीयत् ?

काकू : तेच बघतेय् मी ? ( तेवढ्यात राजूची आई येते. तिला पाहून ) ह्या बघा राजूच्या आई आल्या. त्यांच्याशीच बोला. ( राजूच्या आईला ) तुमच्या मिस्टरांचा फोन ! ( फोन तिच्या हाती देतात. )

आई : ( फोनवर ) हॅलो...

बाबा : अग, राजू कुठाय् ?

आई : तेच बघतेय् मी ? अहो काकू, मुलं कुठायत् ?

काकू : इतका वेळ इथेच होती. कुठे गेली नेमकी आता ? ( दारात अनू येते. तिच्या पाठोपाठ अभि. ) ही बघा, अनू आली.

आई : काय ग, कुठं गेली होतीस ? राजू कुठाय्? बाबांचा फोन आलाय्. बघ काय म्हणतायत्.

अनू : ( फोनवर ) हॅलो, बाबा, गिरिजाबाईंकडे फोन करायला सांगितलं होतंत् ना तुम्ही ? तसा राजूनं फोन केला तर फोनवर कुणीतरी बाई ओरडल्याचा आवाज ऐकू आला. 'वाचवा, सोडवा' असं काहीतरी ओरडल्या त्या बाई.

बाबा : मग ?

अनू : तुम्हाला हे सांगण्यासाठी राजूनं फोन केला तर तुम्ही कुठेतरी बाहेर गेला होतात.

बाबा : बरं, राजू कुठाय्?

अनू : त्या बाईचा आवाज ऐकल्यानंतर तो पम्याला घेऊन कुठेतरी गेला आणि त्यांच्यापाठोपाठ नीतू आणि मिनीही गेली.

बाबा : बरं, तुम्ही आता घरातच थांबा. मी बघतो, काय करायचं ते! (फोन ठेवतात. खिडकीत काळोख)

आई : काय ग, काय झालं? तू बाहेर कुठे गेलीस?

अनू : अग, राजू आणि पम्या धावल्याबरोबर नीतू, मिनी पण पळाल्या. त्यांना थांबवायला मी आणि अभि गेलो, तेवढ्यात दार लागलं. किल्ली आत राहिली.

काकू : अग, पण मला का नाही सांगितलंस?

अनू : तुमच्याकडे गेले तर दाराला कुलूप होतं.

काकू : अग्गोबाई, दोन मिनिटं त्या शेजारच्या मामींकडे गेले टी. व्ही. पहायला. तेवढ्यात हा गोंधळ. कित्ती दिवसापास्नं बोलावत होत्या म्हणून दोन मिनिटं गेले, तर हे रामायण.

आई : तुमचं झालं टी. व्ही. बघणं. पण इथे या पोरांनी काय घोळ करून ठेवलाय्! मी तुमच्यावर मुलं सोपवून गेले आणि तुम्ही बसलात टी. व्ही. बघत.

काकू : अहो, पण तशी दोनदा येऊन गेले मी. मुलं आपल्या कामात गर्क होती, म्हणून...

आई : काय ग अनू, बाबा काय म्हणाले?

अनू : ते म्हणाले, तुम्ही घरातच थांबा.

काकू : घरात काय थांबा? माझा जीव, बाई, टांगणीला लागलाय्.

आई : काय ग अनू, तुला तरी माहीत आहे का गिरिजाबाईंचं घर?

अनू : हो.

काकू : मग चला बाई, आपण तिकडेच जाऊ.

[ चौघंही जातात. राजूच्या घरात काळोख. गिरिजाबाईंच्या घरात प्रकाश. मोहन आणि काळ्या आतून गाठोडी, बॅगा घेऊन येतात. ]

मोहन : चला. बरीच जमवाजमव झाली. ( गिरिजाबाईंना ) मावशी, तुला मी शेवटचं विचारतोय्. तू तुझी इस्टेट माझ्या नावानं करणार आहेस की नाही ?

[ गिरिजाबाई नकारार्थी मान हलवत 'ऊं हूं' असा आवाज करतात. ]

मोहन : मुकाट्यानं या कागदावर सही कर. काळ्या, तिचे हात सोड. ( काळ्या गिरिजाबाईंचे हात सोडू लागतो. हे पाहून गिरिजाबाईंपुढे कागद धरून ) या कागदावर सही कर.

[ गिरिजाबाई खुणेने 'कागदावर काय लिहिलंय् ?' असं विचारतात. ]

मोहन : काय लिहिलंय् ? वाच तूच. ( त्यांच्यापुढे कागद धरतो. त्या वाचू लागतात, गंभीर होतात, सही करण्यास तयार होत नाहीत. त्यावर–) का ? सगळी मालमत्ता माझ्या नावानं करायची नाही ?

गिरिजाबाई : ऊं हूं.

मोहन : मला तुझ्याकडून पैसा मिळणार नसेल तर मी तो त्या अनाथ मुलांनाही मिळू देणार नाही. बऱ्या बोलानं सगळे पैसे माझ्या नावे केलेस तर ठीक. नाहीतर पैसे कुणाच्याच उपयोगी यायचे नाहीत आणि जी गत पैशाची तीच गत तुझी होईल. ( जोरात हसत ) काळ्या, तुझ्याकडे मघाशी दिलं, ते दे.

[ काळ्या खिशात हात घालतो तोच दारावरची बेल वाजते. ]

मोहन : काळ्या, तिथेच थांब. दार उघडू नकोस.

काळ्या : पण साहेब...

मोहन : बेल वाजवून वाजवून बाहेरचा माणूस कंटाळून निघून जाईल. ( बेल वाजतच राहते. मोहनला 'काय करावं' काहीच सुचत नाही. ) जा, बघ जा, कोण आहे ते !

[ काळ्या जातो. त्याला बाजूला करून राजू धावतच आत येतो. त्यामुळे काळ्या बाहेर ढकलला जातो. राजूच्या पाठोपाठ पम्या आणि त्याच्या मागून काळ्या येतो. ]

मोहन : ( ओरडत ) काळ्या, ही मुलं कोण ?

काळ्या : माहीत नाही, साहेब.

मोहन : मग त्यांना तू आत का घेतलंस ?

काळ्या : दार उघडल्याबरोबर ती मला ढकलून आत धावली.

मोहन : ( चिडून ) पण, तू दार का उघडलंस् ?

काळ्या : तुम्ही सांगितलं म्हणून !

मोहन : चूप. ( राजूला ) काय रे, कोण हवंय् ?

राजू : गिरिजाबाईंकडे काम आहे आ[illegible]ं.

मोहन : अच्छा, म्हणजे तो फोन तुझा होता तर ! काळ्या, बघतोस काय ? पकड त्या पोराला.

[ काळ्या राजूला पकडायला धावतो. राजू त्याला चुकवतो. पडतो. हे पाहून मोहन राजूला पकडायला जातो. काळ्या परत पम्याला पकडू पाहतो. पम्या त्याला ढकलतो. पम्या व राजू काळ्या व मोहनला अशा रीतीने चकवतात की काळ्या मोहनलाच धरतो. मोहनच्या हे लक्षात येताच तो चिडतो. दोघे पुन्हा

मुलांना पकडायला धावतात. त्यांना चकवायचा मुलं बराच वेळ प्रयत्न करतात. पण शेवटी मोहन व काळ्या मुलांना पकडतात आणि त्यांना खुर्च्यांवर बसवून ठेवून बांधू लागतात. तोच आतल्या दारातून मिनी व नीतू हातात पळी, लाटणे घेऊन येतात. मोहन व काळ्या मुलांना बांधण्यात गुंतल्यामुळे त्यांची मुलींकडे पाठ असते. त्याचा फायदा घेऊन मुली त्यांच्या डोक्यात आपली हत्यारे मारतात. मोहन व काळ्याला काहीच कळत नाही; काय करावं, सुचत नाही. मुली मुलांना सोडवू लागतात. ते लक्षात येताच मोहन व काळ्या मुलींना पकडायला धावतात. नीतू मोहनच्या हातात सापडताच त्याला चावून आपली सुटका करून घेते. धावपळ होते. एकच गोंधळ उडतो. गिरिजाबाई भांबावलेल्या नजरेने सगळीकडे पाहात असतात. शेवटी मोहन व काळ्या मुलींनाही पकडण्यात यशस्वी होतात व त्यांना बांधू लागतात. ]

काळ्या : ( मिनीला ) काय ग, कुठून आलात तुम्ही ?

मिनी : तुम्हाला काय करायचंय् ?

मोहन : चूप. सरळ उत्तर दे.

नीतू : हाड् ! तुम्ही कोण ? आम्ही तुम्हाला ओळखत नाही.

मोहन : उलट बोलतेस ? ( नीतूचा कान पिळतो. )

मिनी : आहाहा ! काय पण शूर माणूस ! लहान मुलीचा कान पिळतो. हूं !

मोहन : ए पोरी, जास्त वटवट करू नकोस. काळ्या, आपल्याला या पोरांचा बंदोबस्त केलाच पाहिजे. तू आत जाऊन बघून ये, जा, या पोरी कुठून आल्या ते ! ( काळ्या आत जातो. )

काळ्या : ( आतूनच ) साहेब, घराचा मागला दरवाजा उघडा होता.

म्हणजे पोरी तिकडूनच आल्या वाटतं.

मिनी : हो. नारायणनंच आम्हाला आत सोडलं.

मोहन : काळ्या, नारायण बघ आहे का आतमध्ये! (मुलांना) लोकांच्या उपयोगी पडायला निघाला होतात ना? आता बघा गंमत.

काळ्या : (धावत येत) साहेब, नारायण आतमध्ये नाहीये.

मोहन : चूप रे.

काळ्या : (किंचाळत) साहेब, पोलीस...

[आतल्या दारातून इन्स्पेक्टर देशमुख नारायणबरोबर येतात. त्यांची मोहनशी थोडीशी झटापट होते. त्याच्यावर ते पिस्तूल रोखतात. तो हात वर करून उभा राहातो. दुसऱ्या हाताने काळ्याला पकडून दाराबाहेर ढकलतात.]

बाबा : काय मोहनराव, चांगल्या रीतीनं राहता येत नाही वाटतं?

[या वेळेपर्यंत मुलं व गिरिजाबाई सुटली आहेत.]

गिरिजाबाई : तेच सांगून सांगून थकले मी. चांगला वागला असता तर दिले असते चार पैसे!

बाबा : त्याला तुमची भाषा नाही कळायची. (त्याला बाहेर ढकलीत) कॉन्स्टेबल, याला ताब्यात घ्या.

राजू : पण बाबा, तुम्हाला कसं कळलं आम्ही इथे आलो ते?

बाबा : तुझा फोन येऊन गेल्याचं कळलं, म्हणून मी घरी फोन केला. तेव्हा अनूनं सगळं मला सांगितलं. त्यावरून मी अंदाज केला की तू इकडेच आला असणार. म्हणून मी इकडे आलो.

राजू : बाबा, पपू सापडला?

बाबा : हो. त्याच्याबरोबरचा तो अनिलसुद्धा सापडला. आणि एक मेसळीचा ट्रक...

राजू : हां हां, तो मालाचा टक !

बाबा : पण काय रे, तुला कसं कळलं त्या ट्रकबद्दल ?

राजू : तेच तर सांगतोय् मी. आज आपल्या फोनवर सारखी क्रॉस लाईन लागत होती आणि त्यावरचं बोलणं आम्ही ऐकत होतो....

बाबा : (रागानं) राजू, तुला किती वेळा सांगितलं मी, लोकांचं बोलणं ऐकू नये म्हणून ?

राजू : पण बाबा, त्यांनीच आम्हाला फोन केला....

बाबा : ठीक आहे. आज तुमच्या या चोरून ऐकण्यामुळे तीन गुन्हे उघडकीला आले. पण पुन्हा असं चोरून ऐकायचं नाही. समजलं ?

राजू : समजलं.

बाबा : काय गिरिजाबाई, उद्या प्रदर्शनाला येणार ना ?

गिरिजाबाई : येणार म्हणजे ? येणार. येणार आणि मुलांना मोठं बक्षीससुद्धा देणार. आज या मुलांच्यामुळंच वाचले मी. नारायणा, डबा आण पाहू लाडवाचा. सगळ्यांचं तोंड गोड करू या.

[ नारायण डबा आणायला आत जातो. बाहेरून अनू, अभि, आणि ढमढेरेकाकू येतात. ]

आई : ही बघा, सगळी मुलं इथंच आहेत.

काकू : (राजूला आणि पम्याला धपाटा घालीत) काय रे, मला न सांगता घराबाहेर गेलात ? (राजूला) तुमच्या आईनं तुम्हाला माझ्या-वर सोपवलं होतं ना ? मग ?

नारायण डबा घेऊन येतो व सर्वांना लाडू देऊ लागतो. ]

राजू : बाबा. ही सगळी त्या फोनची करामत !

पम्या : म्हणजेच फोनने वाजवला बेंडबाजा !

[ मुलं गातगात नाचू लागतात. ]

मुलामुलींनी केली मजा
फोनने वाजवला बेंडबाजा ॥
चुकून एक फोन ला[illegible]
त्यातून एक उपाय [illegible]
त्यांच्याच शब्दात दम त्यांना दिला
' तुम्ही कोण आहात ते मला माहीताय् ,
तुम्ही काय केलंत, ते आम्ही पाहिलंय् ! '
गुन्हेगारांना आता मिळेल सजा ।
फोनने वाजवला बेंडबाजा ॥

—पडदा—

9339 दि 29/9/02
बा॰वा॰

BVBK-0401331